अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | रविवार, दि. १८ सप्टेंबर २०२२ ▸ वर्ष : २० वे ▸ अंक : ३४९ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## राज्यात पुन्हा अतिवृष्टी; भीमाकाठच्या लोकांना इशारा

✔ **सोलापूर** : राज्याच्या काही भागात शनिवारी पावसाचे आगमन झाले. मुंबई, पुणे व ठाण्याला पावसाने झोडपून काढले.पुण्यात मुसळधार पाऊस सुरू असल्याने दौंड येथून उजनी धरणात पाण्याचा विसर्ग वाढवण्यात आला आहे.

त्यामुळे रात्रीतून विसर्ग वाढवण्यात आल्याने भीमा नदीकाठच्या लोकांना सावधानतेचा इशारा देण्यात आला आहे. मागच्या काही दिवसांपासून थैमान घातलेल्या पावसाने दोन दिवस पश्चिम महाराष्ट्रात उघडीप दिली. मुंबईसह उपनगरात पावसाने मागच्या २४ तासांत जोरदार हजेरी लावली. याचबरोर पुण्यात पावसाचा जोर वाढल्याने धरणांच्या पाणी पातळींत झपाट्याने वाढ झाली असून खडकवासलासह अनेक धरणांमधून पाण्याचा विसर्ग वाढवण्यात आला आहे. यामुळे नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. मुंबईसह उपनगरातही पावसाची रिपरिप सुरूच आहे. याशिवाय कोकण आणि मध्य महाराष्ट्रात पावसाने हजेरी लावली. तसेच सातारा जिल्ह्यातील कोयनेतूनही पाण्याच विसर्ग वाढवण्यात आला आहे.

हवामान विभागाच्या माहितीनुसार, मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, बुलढाणा, परभणी, वर्धा, नांदेड, अकोला जिल्ह्यात जोरदार पाऊस होण्याची शक्यता आहे.

# पावसाने झोडपले, 'राजा' फिरतोय सुखात; बळीराजा हवालदिल, 'रावसाहेब' बसलेत निवांत


✔ सुराज्य/सोलापूर

**अतिवृष्टीमुळे सोलापूर जिल्ह्यातील खरिपाची उभी पिके पाण्यात आहेत. सर्वत्र ढगफुटीसदृश्य पाऊस झाल्याने शेतजमिनीला अक्षरशः तळ्याचे स्वरूप आले आहे. या पाण्याचा निचरा अजूनही होत नाही. त्यातच अजूनही पाऊस झोडपत आहे. शेतात पाणी साचल्याने रब्बी हंगामाच्या पेरण्याही करता येणार नाही. राजाने मारले अन् पावसाने झोडपले तर दाद कुणाकडे मागायची, असा आक्रोश शेतकरी वर्गातून नेहमीच होत असतो. त्याची दाद ना फिकीर. यंदाच्या पावसाचे थैमान पाहता वरूणाने झोडपले तर राजा म्हणजेच सरकार (मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे सुखात दौरे सुरू आहेत) डोळे झाकून बसले आहे, अशी संतप्त भावना ग्रामीण भागात उमटत आहे. पिके पाण्यात असतानाही पंचनामा होत नाही. तलाठी रावसाहेब म्हणतात, आम्हाला आदेश नाही. शेतकऱ्यांची अशी ही दैना पूर्वी कधीच झालेली नाही. तेव्हा आपल्याला वाली कुणी आहे काय? असे संतप्त सूर शेतकरी वर्गातून उमटत आहेत.**

अतिवृष्टीचा जिल्ह्यातील पाच तालुक्यांना फटका बसला आहे. जिल्हा कृषिअधिकाऱ्यांनी केलेल्या पाहणीमध्ये शेतातील उभी पिके पाण्यात असल्याचे दिसून आली. मात्र मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले असताना जिल्हा प्रशासनाकडून अद्याप पंचनाम्याचा पत्ता नाही तलाठी म्हणतात अद्याप आम्हाला पंचनाम्याचे आदेश नाहीत. त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. प्रशासन मात्र थंड कुल कुल असल्याचे चित्र दिसून येत आहे. जिल्ह्यात अति पावसाने पाच तालुक्यातील ८० गावातील पिके बाधीत झाली आहेत. यामध्ये खरिपातील ३४ हजार २६४ हेक्टर क्षेत्रावरील पिकांना फटका बसल्याचा कृषी विभागाचा प्राथमिक अंदाज आहे. तसेच ३ हजार ३३६ हेक्टर बागायती व २ हजार २२६ हेक्टर क्षेत्रावरील फळबागांचे नुकसान झाले आहे.

करमाळा, बार्शी, उत्तर व दक्षिण सोलापूर आणि अक्कलकोट या पाच तालुक्यातील ४७ हजार ४८१ शेतकऱ्यांचे पिकांचे नुकसान झाल्याचे दिसून येत आहे. या पाच तालुक्यात मूग, उडीद, सोयाबीन, तूर, भुईमूग व मका ही पिके पाण्यात गेली आहेत. मूग, उडिदाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. ही दोन्ही पिके काढणीवर असताना जोरदार पावसाचा फटका बसला आहे.

यामुळे मोठे नुकसान शेतकऱ्यांचे झाले आहे. खरीप पीक काढणीला आलेले असतानाही शेतात पाणी थांबल्याने अडचणींचा सामना शेतकऱ्यांना करावा लागत आहे. ढगाळ हवामान आणि अधून मधून सुरू असलेली पावसाची रिपरिप नुकसानीला कारणीभूत ठरत आहे.



पिके पाण्यात, धडधडतेय छातीत...

अक्कलकोट, बार्शी, दक्षिण व उत्तर सोलापूर तालुक्यातील पंचनामे करण्याचे आदेश संबंधित विभागाच्या वतीने दिले आहेत काम चालू आहे. लवकरच नुकसानीचा अहवाल प्रशासनास सादर केला जाईल

**– बाळासाहेब शिंदे,**
(जिल्हा कृषी अधीक्षक)

### सोयाबीनला मोठा फटका

कृषी विभागाने २ ते १० सप्टेंबर या कालावधीत केलेल्या प्राथमिक पाहणीत गावनिहाय ३९ हजार ८२७ हेक्टर क्षेत्रांवरील पिकांचे नुकसान झाल्याचे आढळले आहे. सर्वाधिक पेरणी सोयाबीनची आहे. मूग, उडीद, बाजरी ही पिके काढणीच्या मार्गावर आहेत, तर सोयाबीन, मका, तूर, भुईमूग यांना वेळ आहे. सोयाबीनला शेंगा लागल्या आहेत. हे पीक रोगग्रस्त झाली आहेत. त्यामुळे सोयाबीनला अतिवृष्टीचा मोठा फटका बसला आहे.

### तलाठ्यांना नाहीत आदेश

जिल्हा कृषी अधीक्षक बाळासाहेब शिंदे यांनी दक्षिण सोलापूर तालुक्यातील बोरामणी, मुस्ती, संगदरी भागातील शेतीची पाहणी केली. शेतातील पिकांमध्ये पाणी थांबल्याचे शेतकऱ्यांनी निदर्शनास आणून दिले नुकसानाची पंचनामे करावीत अशी त्यांनी मागणी केली तलाठी यांना कृषिअधिकाऱ्यांनी विचारणा केली असता जिल्हाधिकाऱ्यांकडून पंचनामे करण्याचे आदेश नसल्याचे सांगतात

### मंडलनिहाय बाधित शेतकरी व क्षेत्र

करमाळा तालुक्यात जेऊर, उमरड भागातील १४ शेतकऱ्यांचे ६. ८० हे. आर क्षेत्राचे नुकसान झाले आहे. बार्शी तालुक्यातील १३ गावा मधील १३ हजार ५०० शेतकऱ्यांचे १०३१४. ३० हे. आर क्षेत्राचे नुकसान झाले आहे. उत्तर सोलापूर तालुक्यातील मार्डी, वडाळा, तिऱ्हे मंडलातील २१ गावांमधील ७ हजार ७८२ शेतकऱ्यांचे ८२८१ हे. आर क्षेत्राचे नुकसान झाले आहे. दक्षिण सोलापुरातील निंबर्गी मंडलातील ८ गावामधील १९५७ शेतकऱ्यांचे १६२४. ० हे. आर क्षेत्राचे नुकसान झाले आहे. अक्कलकोट मंडलातील करजगी मधील १२गावांतील ८६६५ शेतकऱ्यांचे ६२८४, वागदरी मंडलातील ११ गावातील १०६८५ शेतकऱ्यांचे ७११४ तर दुधनी मंडलातील १४ गावातील ४८५८ शेतकऱ्यांचे ६२०३ हे. आर क्षेत्राचे नुकसान झाले आहे.





तब्बल सात दशकांनंतर म्हणजे सत्तर वर्षांनंतर भारतीय भूमीत चित्ते परतले आहेत. नामिबियातून आणलेले आठ चित्यांना पंतप्रधान मोदी यांच्या ७२ व्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या हस्ते कुनो अभारण्यात सोडण्यात आले.

## पंढरपुरातून वाहतोय ९३ हजार क्युसेकचा विसर्ग

### चंद्रभागा नदीपात्रातील ३० कुटुंबांचे स्थलांतर



✔ **पंढरपूर** : उजनी व वीर धरणामधून सोडण्यात येत असलेल्या विसर्गामुळे पंढरपूर येथे भीमा नदीची पाणी पातळी वाढत असून येथील व्यासनारायण झोपडपट्टीमधील तीस कुटुंबाचे स्थलांतर करण्यात आले आहे. दरम्यान वीरचा विसर्ग २८ हजाराने कमी करण्यात आला असल्याने काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे.

मागील दोन आठवड्यापासून पुणे जिल्ह्यात सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे त्या भागातील सर्व धरणांमधून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सोडण्यात येत आहे. शनिवारी सायंकाळी सहा वाजेपर्यंत उजनीतून भीमा नदीमध्ये ९३ हजाराचा विसर्ग सोडण्यात येत होता. तर वीरचा विसर्ग शुक्रवारी मध्य रात्री पर्यंत ४३ हजार क्युसेक होता, तो शनिवारी सकाळी कमी करण्यात आला. सायंकाळी सहा पर्यंत वीर मधून १५ हजार ९११ क्युसेक पाणी सोडणे सुरू होते. उजनी व वीरचे पाणी संगम पासून एकत्रित पंढरपूरमध्ये येते. यामुळे पंढरींत भीमा नदी सायंकाळी सहा वाजता जवळपास १ लाख क्युसेकने वाहत होती. नगरपालिका प्रशासन तसेच स्थानिक नगरसेवक विक्रम शिरसट यांनी येथील नागरिकांची भेट घेऊन घरे सोडण्याचे आवाहन केले. या ठिकाणी प्रांताधिकारी गजानन गुरव यांच्यासह पोलीस निरीक्षक अरुण पवार, उपमुख्याधिकारी सुनील वाळुजकर यांनी भेट देऊन पाहणी केली. तसेच नदी काठच्या झोपडपट्टीमधील नागरिकांनी घरात राहू नये असे आवाहन केले.

### दौंडचा विसर्ग वाढला

पुणे जिल्ह्यातील पावसाचे पाणी व उजनीच्या वरील धरणातून विसर्ग सुरूच असल्याने दौंड येथे सायंकाळी सहा वाजता १ लाख ३८ हजार क्युसेकने पाणी येत होते. हे पाणी थेट उजनी धरणामध्येच येते. उजनीतून सायंकाळी सहा वाजता ९४ हजार क्युसेकने पाणी सोडण्यात येत होते.

## विकास नगरातील चंदनाच्या झाडाचे बुंदे पळवले

✔ **सोलापूर** : विकास नगर येथील निलगिरी बंगल्या मधून दहा हजार रुपये किमतीची चंदनाच्या झाडाचे बुंदे तोडून नेल्याची घटना घडली. याप्रकरणी पो. कॉ. अभिजीत दत्तात्रय शिंदे (वय-३४, रा.सिद्धेश्वर नगर, कल्याण नगर शेजारी) यांनी सदर बाजार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

शिंदे यांना ड्युटीवर असताना लॉनमध्ये असलेले एक मोठे चंदनाचे झाड कापलेले दिसले. तेथे जाऊन पाहणी केली असता झाड तोडल्याची व त्याचा बुंधा नसल्याचे दिसून आले. बंगल्यातील गेस्ट हाऊस च्या बाजूस झाड व पाण्याच्या टाकीजवळील चंदनाचे झाड तुटलेले दिसले व त्याचा ही बुधा नसल्याचे दिसून आले. तिन्ही चंदनाचे झाड तोडून त्याचे बुंदे अज्ञात चोरट्याने चोरून नेलेली आहेत, असे फिर्यादीत नमूद आहे. घटनेचा पुढील तपास पोसई गायकवाड हे करीत आहेत.



## 'लम्पी'साठी 'टास्क फोर्स'

### पशुसंवर्धन आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली कार्यदलाची स्थापना





✔ **सोलापूर** : राज्यात लम्पी स्किनचा प्रादुर्भाव वाढत असल्याने राज्य सरकारने पशुसंवर्धन आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली टास्क फोर्स ची स्थापना केली आहे.

राज्यात ४ ऑगस्ट रोजी गोवंशीय पशुधनास लम्पी स्किन ची बाधा झाल्याचे समोर आले. त्यानंतर हा संसर्गजन्य आजार सध्या २२ पेक्षा जास्त जिल्ह्यात पसरला आहे. वेगाने पसरणाऱ्या या आजाराची धास्ती शेतकऱ्यांनी घेतली असून सरकारने तात्काळ टास्क फोर्स ची स्थापना करण्याची मागणी केली होती. याबाबत दै.सुराज्य ने आवाज उठविला होता.

सुराज्य IMPACT

शासकिय पातळीवर खबरदारीचा उपाय म्हणून जनावरांचे बाजार बंद्र केले आहेत. राज्य नियंत्रण क्षेत्र म्हणून घोषित केले आहे. लसीकरण करणेही सुरू केले आहे.बाजार बंद असले तरी ही जनावरांची खरेदी विक्री चालू आहे.बाहेरून जनावर खरेदी करून आणल्यानंतर त्यांच्यात या आजाराची लक्षणे आढळून येत आहेत.हा आजार नियंत्रणात आला नाही तर याचा परिणाम दुग्धव्यवसायावर होणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे.तसेच आगामी काळात साखर कारखान्यांचे गळीत हंगाम सुरू होणार आहेत. त्यामुळे जनावरांचे मोठ्या प्रमाणात स्थलांतर होणार आहे. अशा वेळी आजार पसरला जाणार असल्याने खबरदारी घेतली जात आहे. त्यामुळे राज्य सरकारने टास्क फोर्स ची निर्मिती केली असून लम्पी स्किन चा आढावा घेणे,आजार नियंत्रणात आणण्यासाठी वेळोवेळी उपाययोजना अंमलात आणणे,स्थानिक पातळीवरील यंत्रणेस मार्गदर्शन करणे, आणि आजार आटोक्यात आणण्यासाठी सरकारला सूचनांची शिफारस करणे आदीसाठी टास्क फोर्स ची निर्मिती केली असून पशुसंवर्धन आयुक्त या फोर्सचे अध्यक्ष असतील.तसेच ही टास्क फोर्स उतर प्रदेशातील भारतीय पशुचिकित्सा संशोधन केंद्राच्या प्रमुखाशी व्हिडिओ कॉन्फरसिंगद्वारे चर्चा करणार आहे.

### असा असणार टास्क फोर्स

या टास्क फोर्सचे सदस्य सचिव पशुसंवर्धन उपायुक्त असून पशुसंवर्धन अतिरिक्त आयुक्त, पशुजैव पदार्थ निर्मिती प्रयोगशाळा सहआयुक्त, भारतीय पशुचिकित्सा संशोधन संस्थेचे शास्त्रज्ञ, नागपूर येथील पशू व मत्स विज्ञान विद्यापीठाचे संचालक, परभणी येथील पशुवैद्यकीय महाविद्यालयाचे परोपजीवी शास्त्र विभाग प्रमुख, परळ येथील पशुवैद्यकीय महाविद्यालयाचे सूक्ष्मजीव शास्त्र विभागाचे विभाग प्रमुख, उरळीकाचंन येथील भारतीय कृषी औद्योगिक प्रतिष्ठानचे वरिष्ठ उपाध्यक्ष, पशुरोग नियंत्रण विभागाचे उपायुक्त आदी या टास्क फोर्स मध्ये असतील.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



'त्यांनी' विद्यार्थ्यांसमोर चांगलाच आदर्श ठेवलाय !!

कल्याण
130-43-247

## शेटफळच्या शेतकऱ्याचा पेरु केरळच्या बाजारात


### ■ किलोला ८५ रूपये दर; व्ही.एन.आर जातीची लागवड

✔ सुराज्य/सोलापूर

**करमाळा तालुक्यातील शेटफळ येथील दत्तात्रय लबडे या शेतकऱ्याचा पेरू केरळ बाजारपेठेत विकला जात असून एक किलोला पंचाऐंशी रुपये दर मिळत असून यावर्षी त्यांना दोन एकर पेरू पासून सतरा लाख रुपयांपेक्षा जादा उत्पन्न अपेक्षित आहे.**

शेतकरी आपल्या शेतीमध्ये नेहमीच वेगवेगळे प्रयोग करीत असतो.येथील दत्तात्रय रामदास लबडे यांनी चार वर्षांपूर्वी आपल्या शेतामध्ये मध्य प्रदेशातील नर्सरीमधून रोपे आणून दोन एकर व्ही.एन.आर जातीच्या पेरूची लागवड केली आहे. आतापर्यंत त्यांनी भरघोस उत्पादन मिळवत दोन पिके घेतली आहेत. सध्या त्यांनी तिसऱ्यांदा आपल्या बागेतील पेरूची काढणी सुरू केली असून दोन एकरामध्ये २० टन पेरूची विक्री करत आतापर्यंत सरासरी सत्तर रुपयाचा दर मिळवत चौदा लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे. आणखी दहा टनापर्यंत उत्पादन अपेक्षित असून सध्या त्यांचा पेरूला केरळ येथील बाजारपेठेत चांगली मागणी असल्याने ते एका व्यापाऱ्याच्या मध्यस्थीने पेरू केरळ येथील बाजारपेठेत पाठवत आहेत. केरळला सध्या प्रतिकिलो ८५ रुपये प्रमाणे दर मिळत आहे.

या वर्षी त्यांना दोन एकर पेरू पिकापासून तेवीस लाखापेक्षा जादा रुपयाचे उत्पन्न अपेक्षित आहे. प्रगतशील बागातदार म्हणून ओळख असलेल्या दत्तात्रेय लबडे यांनी आजपर्यंत आपल्या शेतात ऊस केळी कलिंगड शतावरी याचे भरघोस उत्पादन घेतले आहे. सध्या गावातील शेतकरी गटशेतीच्या माध्यमातून केळीबरोबरच पेरू पिकाचाही प्रयोग करत आहेत आतापर्यंत पुणे मुंबई दिल्ली बाजारपेठेत या गावातील पेरू पाठवला जात होता परंतु लबडे यांनी प्रथमच यावर्षी केरळ राज्यांमध्ये आपला पेरू पाठवण्यास सुरुवात केली असून त्यांना दरही चांगला मिळत असल्याने समाधान व्यक्त केले जात आहे.



पेरू बागेत केलेल्या योग्य नियोजनामुळे मिलीबग सारख्या रोगांपासून त्यांची बाग दूर ठेवण्यात त्यांना यश मिळाले आहे. फळ खराब होऊ नये म्हणून त्यांनी क्रॉप कव्हर व प्लॅस्टिक बॅगचा वापर केला आहे.

यामुळे कोणत्याही रोगापासून पेरूचे संरक्षण तर झालेच असून पिकाचा गुणवत्ता व दर्जा हे चांगला राखण्यात त्यांना यश मिळाले आहे सध्या त्यांची पेरू शेती या परिसरातील इतर शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शक ठरत असून आपल्या शेतीमध्ये माहितीसाठी आलेल्या इतर शेतकऱ्यांना ते आवर्जून या पिकातील बारकावे समजावून सांगत सांगतात.

माझ्या दोन एकर क्षेत्रामध्ये मी पेरूचे पीक घेतले आहे. मागील दोन वर्षात कोरोनामुळे उत्पादन चांगले मिळूनही माझ्यासह अनेक शेतकऱ्यांना अपेक्षित उत्पन्न मिळू शकले नाही यामुळे वेगळे पीक घेण्यात आपण चुकलो तर नाहीना अशी शंका येत होती मात्र यावर्षी दरही चांगला मिळत असल्याने जादा उत्पन्न मिळण्याची अपेक्षा आहे.

**- दत्तात्रय लबडे**
(पेरू उत्पादक शेतकरी, शेटफळ ता.करमाळा)

# जनजाती कल्याण आश्रमाचे कार्य

**अखिल भारतीय वनवासी कल्याण आश्रमाची स्थापना २६ डिसेंबर १९५२ रोजी जशपूर येथे त्यावेळच्या मध्यप्रदेशात जनजाती समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कल्याण आश्रमाची निर्मिती झाली. जनजाती समाजाला समजून घेऊन, विश्वास देऊन विविध प्रकारच्या माध्यमातून मदतीचा व मार्गदर्शनाचा हात देत त्यांना समाजाच्या विकसित प्रवाहात सामावून घेण्याचा प्रयत्न कल्याण आश्रम गेली ७० वर्ष करत आहे. ह्याच कल्याण आश्रमाच्या सोलापूर शाखेच्यावतीने अति दुर्गम भागातील रान (वन) भाज्यांचा परिचय व आस्वाद सोलापूरकरांना मिळावा म्हणून रानभाजी महोत्सवाचे आयोजन रविवार १८ सप्टेंबर रोजी सोलापुरातील नू.म.वि. शाळेत(स ११ते ५,डफरिन चौक) करण्यात आले आहे.**

कल्याण आश्रमाच्या विविध उपक्रमांपैकी हा एक उपक्रम आहे. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य असे की, नागरी वस्तीमध्ये अशा प्रकारचा कार्यक्रम देशामध्ये सोलापुरात प्रथम होत आहे. ही संकल्पना नगरवासीयांना नवीन आहे. या महोत्सवाचे आयोजन करण्यामागे कल्याण आश्रमाचा हेतू असा आहे की, जनजाती समाजामध्ये असलेल्या दुर्मीळ वनभाज्यांची ओळख नगरवासीयांना व्हावी. या भाज्यांचे अनेक औषधी उपयोग देखील मानवाला होत आहे. तसेच अशा प्रकारच्या महोत्सवामुळे जनतेमध्ये कल्याण आश्रमांची व त्यांच्या कार्याची माहिती व्हावी. वनबंधू व नगरीय समाज ह्यांच्यामधील दरी कमी करून 'तू मै एक रक्त' हे कल्याण आश्रमाचे घोषवाक्य सार्थक करण्याचा हा एक प्रयत्न आहे.

या निमित्ताने कल्याण आश्रमाचा थोडक्यात परिचय करून देण्याचा हा एक छोटासा प्रयत्न आहे. आपला देश १९४७ साली स्वतंत्र झाला. त्यानंतर प्रत्येक राज्यात लोकनिर्मित सरकार स्थापन झाले. मध्यप्रदेशात देखील लोकनियुक्त सरकार आले. त्यावेळचे मुख्यमंत्री रविशंकर शुक्ल हे स्वातंत्र्यानंतर आपल्या जनतेला भेटण्यासाठी प्रवास करत असताना ते जेव्हा जशपूर भागात गेले तेव्हा त्यांना काही धर्मांतरीत लोकांनी काळे झेंडे दाखविले आणि 'जय येशू' अशा घोषणा देऊन 'शुक्लाजी वापस जाओ' असे फलक दाखवले. ह्या प्रकाराची गंभीर दखल त्यावेळी घेण्यात आली. झाल्या प्रकरणाची कारण मीमांसा करत असे निदर्शनास आले की, काही दशकांपासून ब्रिटिश धार्जिण्या शाळांमधून वनवासींना दिलेली शिकवण होती. त्यावर उपाय म्हणून राष्ट्रीय शिक्षण देणारी शासकीय शाळांचे जाळे विणले पाहिजे. त्यासाठी स्वयंसेवी वृत्तीच्या निर्भीड तरुणाची नियुक्ती आवश्यक होती. तेव्हा ठक्कर बाप्पांचे एक विश्वसनीय सहभागी पी.जी. वणीकर यांनी त्यांना रमाकांत ऊर्फ बाळासाहेब केशव देशपांडे यांचे नाव सुचवले. तेव्हा तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी रूरल डेव्हलपमेंट'च्या अंतर्गत बाळासाहेब देशपांडे यांची एरिया ऑर्गनायझर म्हणून नियुक्ती केली.



अत्यंत अल्पावधीत बाळासाहेब देशपांडे यांनी त्या भागात मोठ्या प्रमाणात शाळा सुरू करून मिशनऱ्यांचे वर्चस्व मोडून काढले. १९५० मध्ये ठक्कर बाप्पांचे निधन झाले. बाळासाहेबांचा मुख्य आधारच नाहीसा झाला. सरकारी नोकरीतील कुरबुरींना कंटाळून त्यांनी नोकरीचा राजीनामा दिला आणि रामटेकला त्यांच्या घरी जाऊन परत वकिली सुरू करावी असा विचार करू लागले. त्यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे द्वितीय सरसंघचालक गोळवलकर गुरूजी यांनी बाळासाहेबांना जशपूरमध्येच थांबून वनवासी समाजाकरता चालू असलेले काम सुरू ठेवण्याचे सुचविले. बाळासाहेबांनी ते मान्य केले. त्यानंतर उराव जनजातीतील सहा बालकांना शिकविण्यासाठी घेऊन वनवासी कल्याण आश्रमाची सुरुवात जशपूरमध्ये झाली. २६ डिसेंबर हा कल्याण आश्रमाचा स्थापना दिवस आहे.

**- योगेश दीक्षित -**

सध्या कल्याण आश्रमाचे कार्य संपूर्ण भारतात आहे. कल्याण आश्रमाचे कार्य विविध विभागात चालू आहे. आश्रमात त्याला आयाम म्हणतात. कल्याण आश्रमात सध्या १६ विविध आयामात काम चालू आहे. कल्याण आश्रमाचे काम हे लोकसहभागातून होते. लोकाश्रयावर अवलंबून असलेली ही एक नोंदणीकृत सामाजिक संस्था आहे.

सोलापुरात कल्याण आश्रमाच्या कामाची सुरुवात अंदाजे १९८० पासून झाली. सोलापूर हा नगरीय प्रकारात मोडणारा भाग आहे. सोलापुरात जंगल नाही. वनबंधू देखील अत्यंत अल्पप्रमाणात आहेत. अशा ठिकाणी कामाचे स्वरूप भिन्न असते. नगरीय भागातून साधन सामुग्री, निधी संकलन आदी प्रकारच्या सहकार्याची अपेक्षा असते. त्यानुसार त्यावेळचे हे काम निष्ठेने आणि समर्पण वृत्तीने कार्यकर्त्यांनी केले. त्यामुळे जुन्या कार्यकर्त्यांचा नामोल्लेख करणे उचित ठरते. यामध्ये श्रीपादराव तथा अप्पा लिमये, बाळासाहेब भागवत, अविनाश कोंडा, र.वि. अलाट, दत्ता आराध्ये, मराठे यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. याशिवाय सोलापूरमधील अंजली सारोळकर (पाठक) या १९८२ सालापासून पूर्णवेळ काम करीत होत्या. त्यांनी मणिपूर, छत्तीसगड, दादरानगर हवेली या भागात काम केले. सध्या विनय वरणगावकर यांच्या अध्यक्षतेखाली नवीन तरुण मंडळी त्यांचाच वारसा नेटाने पुढे चालवत आहेत. त्यांच्याच प्रयत्नातून हा उपक्रम राबविला जात आहे. यापूर्वी सोलापुरात २२ सप्टेंबर २०१९ मध्ये वनभाजी महोत्सवाचा उपक्रम राबविण्यात आला होता.




वनभाजी महोत्सवाची सुरुवात सर्वात प्रथम स्पर्धेच्या रूपात झाली. महाराष्ट्रातील धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यातील बारीपाडा हे एक छोटे खेडेगाव येथून झाली. या गावचे रहिवासी व ज्यांच्या कामाची दखल जगाने घेतली असे चैत्रामजी पवार यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार त्या भागात पीएच. डी. करण्यासाठी आलेले शैलेश शुक्ल ह्यांच्या लक्षात आले की, वनामध्ये मानवास उपयोगी अशा अनेक वनभाजी आहेत. ज्यांची शहरी भागातील लोकांना माहिती नाही. तेव्हा त्यांनी चैत्रामजी पवार व इतरांशी चर्चा करून वनबंधूंकडे असलेले ज्ञान शहरी भागातील लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी काय करता येईल अशा विचारातून या मंडळींनी वनभाजी स्पर्धा हा उपक्रम २००४ मध्ये सुरू केला.

या उपक्रमांतर्गत येथील वनभगिनींनी अति दुर्गम भागातील वनभाज्या आणून त्यांचे प्रदर्शन मांडणे, त्यातील काही भाज्या तयार करून त्या परीक्षकांना आणि प्रदर्शन पाहण्यास आलेल्या नागरिकांना खायला देण्यात येऊ लागल्या. या उपक्रमामधून बारीपाडाच्या आसपास असलेल्या शेकडो एकर वनांमधून उपलब्ध असलेल्या जैवविविधतेचा परिचय होऊ लागला. वन संस्कृतीचे संवर्धन होऊ लागले. पारंपारिक वनभाज्यांचे ज्ञान संवर्धन होऊ लागले. 'नर सेवा हीच नारायण सेवा' या उक्तीनुसार कल्याण आश्रमाचे कार्य जोरात सुरू आहे. वनवासी व नगरवासी यांच्यामधील दरी कमी करण्याचा हा एक प्रयत्न छोटासा प्रयत्न आहे.

***



## नुरोद्दीन बाबा व शाहुसेनी बाबा यांच्या उरूसनिमित्त प्रसाद वाटप

**सुराज्य/अक्कलकोट** : अक्कलकोट येथील सर्व हिंदू मुस्लीम भाविकांचे श्रद्धास्थान असलेले शेख नुरुद्दीन बाबा यांच्या उरूस निमित्त प्रति वर्षाप्रमाणे यावर्षी सुद्धा उरूस निमित्त श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोल राजे भोसले यांच्या सहकार्याने येणाऱ्या सर्व भक्तांना गोड महाप्रसाद दुधनी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रथमेश म्हेत्रे यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

यावेळी वटवृक्ष देवस्थान समितीचे अध्यक्ष महेश इंगळे, नगरसेवक सद्दाम शेरीकर, अन्नछत्र मंडळाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, तुषार गायकवाड, अरुण जाधव, शाकीर पटेल, मैनोद्दिन कोरबू, शबाब शेख यांच्या प्रमुख उपस्थितीत वाटप करण्यात आला. यावेळी नौशाद नाईकवाडी, दाऊद शेख, फक्रोद्दिन नाईक, तय्युब नाईकवाडी, सलीम कोरबू, सैपन बुटलेर, बुडन कोरबू, युनूस शेख, दाऊद शेख, मुबारक कोरबू, खलील नाईकवाडी, इरफान शेख, असलम कोरबू, रईस शेख, सुलतान शेख, जोएब कोरबू, मन्सूर सैय्यद, इलियास कोरबू, जावेद नाईक, अल्ली बुटलेर, मुन्ना शेख, सोनू इनामदार, दाऊद मुजावर, एजाज नाईकवाडी, शबाब मुजावर, सलमान सागर, सादिक शेख, नूर कोरबू, अंनिस इनामदार, मजीद कोरबू आदींनी परिश्रम घेतले.

## महर्षी शंकरराव मोहिते प्रशालेत अभियंता दिन साजरा

**सुराज्य/अक्कलकोट** : शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज संचलित महर्षी शंकरराव मोहिते प्रशाला यशवंतनगर, उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम विभाग येथे १५ सप्टेंबर रोजी अभियंता दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सहकारी साखर कारखान्याचे चीफ इंजिनिअर सूर्यकांत गोडसे तसेच प्रशाला समितीचे सभापती ॲड. नितीन खराडे, मुख्याध्यापक संजय गळीतकर व कृषी उत्पन्न बाजार समिती करमाळा चे विद्यमान सभापती शिवाजी बंडगर हे उपस्थित होते. प्रास्ताविकात विभाग प्रमुख विष्णू माने यांनी सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांचे कार्य महान होते हे सांगितले. मान्यवरांच्या हस्ते सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या व शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष कै. शंकरराव मोहिते पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रशालेचे मुख्याध्यापक यांच्या हस्ते मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. प्रमुख पाहुण्यांनी आपल्या भाषणात स. म. शंकरराव मोहिते-पाटील यांनी उभारलेल्या टेक्निकल हायस्कूलमधून उत्तीर्ण झालेले बरेच विद्यार्थी हे सहकारी कारखान्यांमध्ये नोकरीस आहेत व इतर क्षेत्रात विविध पदावर कार्यरत असल्याचे सांगितले. सूत्रसंचालन हनुमंत काळे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी धनंजय देशमुख, राजेंद्र कांबळे, फिरोज कोरबू, शिवराज जंवनाळ, हनुमान कांबळे यांनी प्रयत्न केले.

## भंडारकवठेच्या समर्थ पतसंस्थेचा पाचवा वर्धापन दिन साजरा

**सुराज्य/दक्षिण सोलापूर** : दक्षिण सोलापूर तालुक्यातील भंडारकवठे येथील समर्थ ग्रामीण बिगरशेती नागरी पतसंस्थेच्या पाचवा वर्धापनदिन अत्यंत खेळीमेळीत साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अरुण पाटील प्रमुख पाहुणे हणमंतराव कुलकर्णी, संस्थेचे अध्यक्षपदी अभिजित कापसे, सरपंच चिदानंद कोटगोंडे, बाजार समिती संचालक वसंत पाटील, पंचायत समिती सदस्य विठ्ठल पाटील, माजी चेअरमन भीमाशंकर बबलेश्वर, व्हा. चेअरमन हणमंत पुजारी, प्रकाश कोरे, समाधान घंटे, शेखलाल अत्तार प्रमुख पाहुणे उपस्थित होते. पतसंस्थेच्या वर्धापनदिनानिमित्त भंडारकवठे येथील रहिवासी मल्लिकार्जुन हात्ताळे या पती-पत्नी दांपत्यांच्या हस्ते सत्यनारायण पूजा करण्यात आली. यावेळी मातप्पा जंगलगी, अशोक मुक्काणे, यतीन शहा, श्रीशैल पाटील, सोमलिंग कमळे, संगप्पा बिराजदार, युवराज पाटील, प्रकाश थोरात, शिवानंद माढे, श्रीशैल बबलेश्वर, सोमशंकर पाटील, इरप्पा बिराजदार, ईश्वरप्पा कारभारी, सिदगोंडा हात्ताळे, रामचंद्र बिराजदार, विजय पाटील, बाबूराव पाटील, बिभिषण पाटील, संगप्पा तेलगांव, लायप्पा बुगडे, धरेप्पा तेली, पतसंस्थेचे कर्मचारी सागर कुंभार, विरेश महांता, अप्सर मुल्ला, सचिन गुरव, दादासाहेब पाटील, प्रकाश आबिटकर, मेहबूब नदाफ, बापू पाटील उपस्थित होते.

## जनावरे कत्तलखान्याकडे घेऊन जाणारी गाडी पकडली

**सुराज्य/नातेपुते:** गुरसाळे येथून जनावरे कत्तलखान्याकडे घेऊन जाणाऱ्या महेंद्र पिकवर नातेपुते पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला.

व्यसनमुक्त युवक संघटनेचे दहिगांव व गुरसाळे येथील राहुल सावंत, माउली पाटील, रणजित खंडागळे, आबा खंडागळे, गणेश काटे अर्जुन पवार, बाळासाहेब चिकने हे तरुण रस्त्यावर थांबले असता गुरसाळे ते दहिगांव या रोडने एक पांढरे रंगाचे बोलेरो पिकअप वाहन (गाडी नं. एम. एच ११ ए. जे. ७१४४) ही भरधाव वेगाने जाताना दिसले. गाडीत गाय व जनावरे हे गाडीच्या पाठीमागे परफडत नेताना तरुणांच्या निदर्शनास आले. त्यावेळी त्यांनी गाडीचा पाठलाग करून दहिगांव या ठिकाणी थांबवली असता गाडीतील चालक हा तेथून गाडी सोडून पळून गेला. गाडीमध्ये चार गाई व एक जर्सी गाई बांधलेल्या अवस्थेत दिसल्या. त्यावेळी त्या युवकांनी तात्काळ नातेपुते पोलीस ठाण्याची संपर्क साधला असता तात्काळ पोलीस कर्मचारी येऊन गाडी ताब्यात घेऊन गुन्हा दाखल केला. यामध्ये एक गिर गाई गाडीला फरफटत नेल्याने मृत्यूमुखी पडली आहे. वाहनचालक पळून गेल्याने ही जनावरे कत्तलखान्याकडे नेत असल्याचा संशय बळावला. याबाबत दहिगांव येथील पोलीस पाटील विठ्ठल मोरे यांनी नातेपुते पोलीस ठाणे येथे वाहन चालक व मालक यांच्याविरुद्ध फिर्याद दिली. नातेपुते पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला. सर्व गाई श्रीनाथ गोशाळा, मेडद येथे दादासाहेब ढेरे यांच्याकडे सोडण्यात आल्या.

# राशीभविष्य

### दि. १८ सप्टेंबर ते २४ सप्टेंबर २०२२

**चु, चे, चो, ला, ली, लू, ले, लो, आ**




ग्रहांची उत्तम साथ मिळणार आहे. प्रगतीचा आलेख उंचावून शकाल. मित्र परिवाराच्या साथीने आपण आपले संरक्षणाचे कवच मजबूत करू शकाल. उलाढाल वाढण्याची शक्यता आहे. वरिष्ठांमध्ये आपले कौतुक होईल. यशाचा आलेख वाढता राहील. कौटुंबिक वातावरण कलहाचे शांत राहण्याची योग्य ठरेल. आपला स्वभावच आपल्याला हानी कारक आहे याची जाणीव होईल. बँकेची कामे मार्गी लागतील त्यातून मिळणारे समाधान गृहसौख्य वाढवेल पत्नीकडून आपले आरोग्याची काळजी घेतली जाईल. घरामध्ये नवीन वस्तूंची खरेदी होऊ शकते. मन प्रसन्न राहील.आपल्या हाताखाली काम करणारे आपल्याला त्रास देऊ शकतात. गृहसौख्य उत्तम राहील. विद्यार्थ्यांसाठी अभ्यासाचे काळजी घ्यावी लागेल.

**शुभ उपासना -चंद्र व गणपती**


**इ, उ, ए, ओ, वा, वी, वू, वे, वो**




आपण द्विधा अवस्थेत असणारे, त्यामुळेच फसव्या कल्पना समोर येणे शक्य आहे. सावध राहावे. आपल्या कलागुणांना वाव मिळेल. मन स्थिर ठेवणे हेच आपल्यासाठी मोठे आव्हान असेल. भाऊबंदकी वगळता अन्य कौटुंबिक प्रश्नात थेट उपाय करा. विचारविनिमयातूनही ते सुटू शकतात. नोकरीधंद्यात बदल होतील. शिक्षणात अडथळा निर्माण होऊ शकतो. अचानक नोकरी सुटल्याने आर्थिक चणचण निर्माण होईल. प्रेमप्रकरणात अपयश प्रॉपर्टीतून लाभ होतील. महिलांसाठी आपले म्हणणे समोरच्याला व्यवस्थित समजावून सांगावे. बोलण्यातून गैरसमज निर्माण होऊ शकतील. जोडीदारांशी मतभेद वाढवून देऊ नका. वृद्धांची विशेष काळजी घ्यावी लागेल. घरामध्ये काही कारणातून वाद संभवतात. विद्यार्थ्यांसाठी - संमिश्र.

**शुभ उपासना - देवी व विष्णू.**

**का, का, कू, घ, गं, छा, के, को, हा**




किरकोळ कारणावरून मानसिक अस्थिरता जाणवेल. मानसिक तणावाचे प्रसंग अनुभवास येतील. मृत्युपत्र वारसा विमा व्यवहार कटकटी. वारस धनाचा वाद निघेल कोर्टाची पायरी चढावी लागेल जमिनीच्या वादातून भावा भावा मध्ये कलह निर्माण होऊ शकतो माघार घ्यावी लागेल आरोग्याची काळजी घ्या वडील झाल्यान कडून आपला सन्मान होईल घरामध्ये धार्मिक कार्यात सहभाग नोंदवू शकाल विवाह ठरतील अचानक खर्च संभवतो वाहनांपासून सावध रहा हा आवश्यक तेथेच खर्च करावा जोडीदाराचे विशेष काळजी घ्यावी लागेल कौटुंबिक वातावरण उत्तम महिला वर्गांसाठी कष्टाचा काळ आहे आपले म्हणणे थोडक्यात मांडावे विद्यार्थ्यांसाठी उत्तम काळ.

**शुभ उपासना - चंडी.**

**ही, हू, हे, हो, डा, डी, डू, डे, डो**




ग्रहांची उत्तम साथ मिळणार असल्याने जीवन प्रवास सुखरूप होऊन कार्य साध्य करू शकाल. नव्या इच्छा नव्या कल्पनांना वाव मिळेल. व्यवहारातील तातडीचे निर्णय लाभदायक ठरू शकतील. शास्त्रीय क्षेत्रात आनंद मिळविता येईल. आपले वैचारिक म्हणणे ज्येष्ठांना रुचेल. बढतीचे योग संभवतात. वरिष्ठांची मर्जी आपल्याकडून सांभाळली जाईल नोकरीत शत्रूंचा प्रभाव जास्त राहील. आपल्या बोलण्यातूनच आपले काम काम बिघडू शकते. शेतीच्या कामात अपयश. कोर्टाच्या कामात दिरंगाई चालणार नाही. जोडीदाराकडून कामाचे कौतुक. आर्थिक नियोजन उत्तम राहील. व्यवसायात फायदा होईल. महिलांसाठी आरोग्याची काळजी घ्यावी. विद्यार्थ्यांसाठी-कष्टाने यश.

**शुभ उपासना - गुरूदत्त**

**मा, मी, मू, मे, मो, टा, टी, टू, टे**




ग्रहांची अनुकूलता मिळणार असल्याने परिस्थिती आशादायक आहे. काही प्रश्न उपस्थित होऊ शकतात. वादाचे प्रसंग स्पर्धा या गोष्टींपासून सावध राहा. सुरुवातीच्या काळातच कामे मार्गी लागल्याने समाधान मिळेल. आर्थिक नियोजन उत्तम राहील. एखादी उपासना उत्तम पद्धतीने घडू शकते. सद्‌गुरु कृपा लाभेल. एखाद्या धार्मिक कार्याचे नियोजन करू शकाल. घरामध्ये कार्य ठरू शकेल. वाहनांपासून सावध राहा. बोलण्यावर नियंत्रण ठेवायला पाहिजे आहे. आरोग्य उत्तम राहिल्याने उत्साहाने काम कराल. महिलांना आरोग्याची काळजी घ्यावी लागेल. विद्यार्थ्यांना उत्तम.

**शुभ उपासना - औंदुंबरोपासना.**

**टो, पा, पी, पु, षा, णा, ठा, पे, प**




आपण केलेल्या कार्याबद्दल उगाच शंका घेतल्या जातील. स्थावर प्रश्न मार्गी लागतील. नोकरी प्रगतीसाठी सावधान आर्थिक आवक पण राहिल्याने व्यवसायामध्ये नवीन बदल करू शकाल. व्यवसाय दुसऱ्यावर अवलंबून ठेवू नका. पाहुण्यांची रे-लचेल वाढेल. ज्येष्ठांची मर्जी सांभाळावी. प्रवासामध्ये नुकसानीचे प्रसंग येऊ शकतात. मोठी जोखीम पत्करू नका भागीदारीत वाढ होण्याची शक्यता आहे. मुलांकडे विशेष लक्ष देणे गरजेचे. आरोग्य उत्तम राहील. व्यवसायातील गुंतवणूक उत्तरार्धात लाभदायक ठरेल. विद्यार्थ्यांसाठी - कष्टाने यश प्राप्ती.

**शुभ उपासना - कार्तिक स्वामी.**

**रा, रि, रु, रे, रो, ता, तू, ते,**




अनेक गोष्टी नियोजनपूर्वक ठरवून व्यवस्थित तयारी करूनही, यश देतीलच असे नाही. ऐन वेळी दगा देणारे मित्र गैरसमज झाल्याने नाराज वरिष्ठ, निर्णयात झालेल्या चुका व बिघडलेली तब्येत यांचा फटका बसण्याची शक्यता आहे. घर दुरुस्तीची कामे करावी लागतील. वरिष्ठांकडून आपल्या कामाचे कौतुक होईल. भावंडांकडून चांगला प्रतिसाद मिळाल्याने कार्य साध्य करू शकाल. आपल्या हातून एखादे धार्मिक कार्य घडू शकते. एखादी घटना आपले मन हेलावणारी घडू शकते. जोडीदाराकडून मदत होईल. मानसन्मान मिळेल. मुलांकडून आपल्याला योग्य सन्मान मिळाल्याने आपण निरोगी आहोत, याची साक्ष मिळेल. महिलांवर्गांसाठी शुभ काळ. आपल्या मनासारखे घडत असल्यामुळे आपण उत्साही राहाल. विद्यार्थ्यांसाठी-संमिश्र.

**शुभ उपासना - मारूती**

**तो, ना, नी, नू, ने, नो, या, यी, यू.**




यशाबद्दलच्या अपेक्षा ठेवणे योग्य नाही. ज्येष्ठांच्या नाराजीचे प्रसंग उद्‌भवू शकतात पण चिंता करू नका. कामात मान हानी. कामात अडथळे निर्माण होऊ शकतात. समोरच्याकडून जास्त अपेक्षा ठेवू नयेत. प्रवासात अडचणी निर्माण होऊ शकतात. परंतु नवीन व्यक्तींशी चांगले संभाषण होऊ शकते. त्यातून लाभ संभवतो. मुलांच्या आरोग्याकडे लक्ष द्यावे बदनामीपासून सावध रहा. धार्मिक कृत्यांमध्ये आपला रस वाढेल. आपल्याकडून एखादे चांगले काम काम होईल. घरामध्ये आनंदी वातावरण राहील. शिक्षणासंबंधी आपली चिंता वाढेल. महिलांना आरोग्यविषयक चिंता दूर होतील. विद्यार्थ्यांसाठी- त्रासदायक. **शुभ उपासना - रूद्र व देवी.**

**ये, यो, भा, भी, भू, धा, फा, ढा, भे**




अडथळ्यातून प्रवास करावा लागेल. अचूक निर्णय शक्ती आधार देऊन बाजू सावरेल. सहकारी कार्यक्षेत्रात यश संपादन करण्यास सहाय्य करतील. आरोग्याची काळजी कराल. परंतु मानसिक ताण कमी होईल. बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल. आपली काळजी करणारे कोणीतरी आहे याचा प्रत्यय येईल. आर्थिक नियोजन उत्तम राहिल्याने घरात आनंदाचे वातावरण राहील. धार्मिक कार्यात आपला सहभाग नोंदवू शकाल. आपल्याकडून झालेल्या कार्याचे कौतुक केले जाईल. शेतीच्या कामामध्ये यश मिळेल. विद्यार्थ्यांसाठी कष्टाने यश मिळेल.


**शुभ उपासना - बुधवारी दान**

**भो, जा, जी, खी, खू, खे, खो, गा, गी**





नोकरी व्यवसायातील प्रश्न स्वतः सोडविण्यास खरे तर समर्थ आहात. पण काही गोष्टींना विलंब होणार आहे. अभिलाशा नाहीशा होणार नाहीत, त्यांचा अतिरेकही मनःस्थैर्य देत नाही. काम उशिरा झाल्याने मनस्ताप संभवतो. कोर्ट कचेरीच्या कामात यश मिळेल जमिनीच्या संदर्भातील फायदे मिळू शकतील. धार्मिक कार्यात सहभाग नोंदवू शकाल. गृहसौख्य उत्तम. नवीन घर खरेदीसाठी प्रस्थान ठेवू शकाल. घरामध्ये नवीन कार्य ठरू शकेल. मोठ्यांकडून आपल्या कामाचे कौतुक केले जाईल, परंतु त्यांची काळजीही घ्यावी लागेल जोडीदाराकडून जास्त अपेक्षा ठेवू नये. व्यवसायात मंदी आल्याने मानसिक ताण वाढेल. महिलांसाठी कष्टाने फळ, विद्यार्थ्यांसाठी अभ्यासात दिरंगाई नको. **शुभ उपासना - दत्त**

**गू, गे, गो, सा, सी, सू, से, सो, दा**




कार्याबद्दलचा आत्मविश्वास वाढवू शकाल. बौद्धिक आर्थिक बाजू सावरता येईल. कार्यात नकार घंटा न वाजवता ठामपणे कृती करणे हितकारक होईल. भावंडांना आरोग्याचा त्रास खर्च तुमच्या प्रगतीत थोडा अडथळा संभवतो. प्रवास सांभाळून करावा. प्रवासात कटकटी होण्याचा संभव आहे. शांत रहावे लागेल. कौटुंबिक वैवाहिक जीवनात त्रास जाणवेल. जोडीदाराशी मतभेद बोलणे स्पष्ट चांगले राहणार नाही. पत्नीकडून आपले कौतुक होईल. मुलांची काळजी घ्यावी लागेल. नोकरीत किंवा व्यवसायात विलंब होत असलेली कामे त्वरित होतील. कोर्टकचेरीची कामे मार्गी लागतील महिला वर्गांसाठी आरोग्याची काळजी घ्यावी लागेल. विद्यार्थ्यांसाठी मानसिक ताण वाढेल. **शुभ उपासना - कार्तिक स्वामी**

**दी, दू, झा, ज्ञा, था, दे, दो, चा, ची**




किरकोळ कारणावरून मानसिक अस्थिरता जाणवेल. मानसिक तणा-वाचे प्रसंग अनुभवास येतील. मृत्युपत्र वारसा विमा व्यवहार कटकटी. वारस धनाचा वाद निघेल कोर्टाची पायरी चढावी लागेल जमिनीच्या वादातून भावा-भावामध्ये कलह निर्माण होऊ शकतो. आरोग्याची काळजी घ्या. घरामध्ये धार्मिक कार्यात सहभाग नोंदवू शकाल. विवाहेच्छुकांचे विवाह ठरतील. अचानक खर्च संभवतो. वाहनांपासून सावध रहा. आवश्यक तेथेच खर्च करावा. कौटुंबिक वातावरण उत्तम राहील. आपले म्हणणे थोडक्यात मांडावे. विद्यार्थ्यांसाठी उत्तम काळ.

**शुभ उपासना - देवी व विष्णू**

**।। ज्योतिर्विद ।। श्री. विठ्ठल जोशी वैरागकर, सोलापूर.**

**भ्रमणध्वनी नंबर - ९४२३५३५४७१**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R.N.I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail.com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळये.

# स्वामी समर्थ कारखान्याच्या गळीत हंगामास सुरुवात होणार

- युध्द पातळीवर कामास सुरुवात
- शेतकऱ्यांमध्ये समाधान

**सुराज्य/अक्कलकोट**

स्वामी समर्थ सहकारी साखर कारखान्याचा यंदाचा सन २०२२-२०२३ चा गळीत हंगाम सुरू करण्यात येणार असून या करिता यंत्रसामुग्रीची दुरूस्ती, परिसराची स्वच्छतेच्या कामाला गती देण्यात आली आहे. साखर कारखाना सुरू होणार असल्याने तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांतून समाधान व्यक्त होत आहे. युध्द पातळीवर कामाला सुरूवात झालेली आहे.



स्वामी समर्थ सहकारी साखर कारखाना हा गेल्या ७ ते ८ वर्षापासून बंद होता. तत्कालीन कार्यकारी संचालकांच्या मनमानी भ्रष्ट कारभारामुळे साखर कारखाना अडचणीत आणलेला होता.

बंदच्या काळामध्ये कारखाना सुरू करण्याबाबत पदाधिकारी हे प्रयत्नशील होते. परंतु त्या काळातील निसर्गाच्या लहरीपणामुळे पावसाचे प्रमाण पाहता ऊस म्हणावा तेवढा कार्यक्षेत्र नसल्याने कारखाना बंद ठेवावा लागला. सध्या तालुक्याच्या कार्यक्षेत्रात ऊस लागवडीची क्षमता अधिक असून कारखान्याच्या सभासदांना ऊस घालण्या कामी अडचण निर्माण होऊ नये, या करिता कारखान्याचे अध्यक्ष माजी आमदार सिद्रामप्पा पाटील यांनी पुढाकार घेऊन यंदा सन २०२२-२३ चा गळीत हंगाम सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. सिद्रामप्पा पाटील यांनी यंदाचा गळीत हंगाम यशस्वी करण्यासाठी गेल्या आठ दिवसापासून कारखान्याच्या कार्यस्थळावर ठाण मांडून आहेत. साखर कारखान्याच्या संपूर्ण परिसराची स्वच्छतेचे काम प्रगतीपथावर असून यंत्र सामुग्रीच्या दुरूस्ती करिता तंज्ञाना बोलावण्यात आलेले आहे.

कारखाना सुरू करण्याकामी राज्य सरकारकडून हिरवा कंदील मिळाला आहे. कारखान्याच्या कार्यस्थळावर माजी आमदार सिद्रामप्पा पाटील यांच्या मार्गदर्शन व नेतृत्वाखाली संचालक तथा कृषीरत्न अप्पासाहेब पाटील, संजिवकुमार पाटील, साखर कारखान्याचे व्यवस्थापकिय सचिव अशोकराव मुलगे, शिवानंद पेडसंगे, काशिनाथ चटमुटगे, महेश पाटील, एकनाथ शिंदे (राजेगावकर), दौलतराव अप्पा मोरे, गोटू मंगरूळे, संजय याबाजी, अण्णू याबाजी, मेघराज मल्लिनाथ दुलंगे, बाबूशा करपे, राजशेखर मुळे, बॉलयर कंपनीचे शरद धावड, कार्यकारी संचालक सी. एन. मिसाळ, मुख्य अभियंता हणमंतराव रेड्डी, शिवानंद मानशेट्टी, देवेंद्र बिराजदार, सिध्दाप्पा गड्डी यांच्यासह सर्व संचालक मंडळ, कर्मचारी वर्ग हे कार्यस्थळावर युध्द पातळीवर सुरू असलेल्या कामावर ठाण मांडून आहेत.

### कारखाना समर्थांच्या, ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या आशिर्वादाने सुरू



कारखाना सुरू करण्यासाठी २०२२-२३ चा गळीत हंगाम सुरू करण्याकामी सर्व ती यंत्रणा कार्यन्वीत झाली आहे. श्री स्वामी समर्थ महराजांचा व ऊस उत्पादक शेतकरी, सभासद यांच्या आशिर्वादाने सुरू होत आहे. आजवर ऊस उत्पादक शेतकऱ्यांना झालेल्या त्रासाबद्दल दिलगीर व्यक्त करीत आहोत. सुरू होणाऱ्या गळीत हंगामास तालुक्यातील शेतकऱ्यांनी स्वामी समर्थ सहकारी साखर कारखान्याला ऊस देऊन सहकार्य करावे, असे आवाहन स्वामी समर्थ कारखान्याचे अध्यक्ष तथा माजी आ. सिद्रामप्पा पाटील यांनी केले आहे.



## मध्यवर्ती नवरात्र उत्सव समितीच्या अध्यक्षपदी बनशेट्टी

**सुराज्य/सोलापूर :** सार्वजनिक मध्यवर्ती नवरात्र उत्सव समितीची अध्यक्षपदी श्रीशैल बनशेट्टी तर सचिव पदी दत्तात्रय मेनकुदळे यांची एकमताने निवड करण्यात आली मंडळाची सर्व साधारण सभा शिवानुभव मंगल कार्यालयात मावळते अध्यक्ष विश्वराज चाकोते यांच्या अध्यक्षतेखाली झालीन यात नूतन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्ती करण्यात आल्या. प्रास्ताविक विश्वस्त सुनील रसाळे यांनी केले तर मागिल, सभेचे आढावा जमाखर्च मल्लिनाथ याळगी यांनी सादर केला अमोल शिंदे, दिलीप कोल्हे दत्तात्रय मेनकुदळे विश्वराज चाकोते यांनी आपले विचार व्यक्त केले, या बैठकीस मल्लिनाथ मसरे, विजय पुकाळे, आनंद मुस्तारे, बसवराज येरटे, सचिन धोत्रे, अशोक कलशेट्टी, मल्लिनाथ याळगी, गणेश चिंचोळी आदि सह देवस्थान ट्रस्टी, विविध मंडळाचे पदाधिकारी बहु संख्येने उपस्थित होते नूतन पदाधिकारी असे : अध्यक्ष श्रीशैल बनशेट्टी, उपाध्यक्ष शिवानंद सावळगी, चक्रपाणी गज्जम, मल्लिनाथ सोलापुरे, किसन गर्जे, चेतन चौधरी, महेश बायस, सचिव दतात्रय मेनकुदळे, सह सचिवः मल्लिनाथ याळगी, कार्याध्यक्षः ब्रम्हदेव गायकवाड, मिरवणूक प्रमुख अविनाश हतरकी, अतीष देशेट्टी, मल्लेश पुरवंत, शरद गुमटे, बाबा शेख, शक्ती कटकधौंड, आशीष उपाध्ये कार्यालय प्रमुखः गौरव जक्कापुरे

## विकास आराखडे काळजीपूर्वक करा : दिलीप स्वामी

**सुराज्य/सोलापूर :** राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियान अंतर्गत जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तर व ग्राम पंचायत विकास आराखडा तयार करणे साठी सर्वानी काळजी पुर्वक नियोजन करावे असे आवाहन सिईओ दिलीप स्वामी यांनी केले. शासनाकडील शाश्वत विकास ध्येय अंमलबजावणी करणेसाठी जिल्हातील अधिकारी, कर्मचारी यांनीच राष्ट्रीय डाळींब संशोधन केंद्र केगांव पुणे रोड सोलापूर येथे प्रशिक्षण आयोजीत करण्यात आलेले होते. प्रशिक्षण कार्यक्रम चा शुभारंभ मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष धोत्रे यांचे हस्ते करणेत आला. या प्रसंगी उप मुख्य जिल्हा परिषद सोलापूर चंचल पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी इशाधीन शेळकंदे, जिल्हा जलसंधारण अधिकारी पंडीत भोसले, कार्यकारी अभियंता बांध २ सुनील कटकधोंड, कार्यकारी अभियंता बांध चे संतोष कुलकर्णी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (मबाक. ) जावेद शेख, लेखाधिकारी कैलास कुंभार, लेखा अधिकारी पाचकुडवे, जिल्हा कृषि अधिकारी इतर खातेप्रमुख, गट विकास अधिकारी, तालुका स्तरीय खातेप्रमुख प्रशिक्षणास उपस्थित होते. यशदा पुणे येथून ट्रेनिंग घेतलेले प्रविण प्रशिक्षक हणमंत कादे, महादेव बेळळे, श्री. सदाशिव पांडव, सोमनाथ शिंदे, पिसे यांनी सन २०१३-२४ आराखडे तयार करणे साठी शाश्वत विकास ध्येय मधून समतोल विकास साधला जाईल या बाबत मागदर्शन केले. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष धोत्रे व उप मुख्य कार्यकारी अधिकारी इशाधिन शेळकंदे यांनी मार्गदर्शन केले. सदर कार्यशाळा यशस्वी करणे साठी कनिष्ठ प्रशासन अधिकारी झेड ए शेख, ग्रामविकास अधिकारी वैभव आहाळे, अमोल महिंद्रकर यांनी परिश्रम घेतले.



## रिवॉल्वर डोक्याला लावून शिवीगाळ; तिघांवर गुन्हा

**सुराज्य/सोलापूर :** रिवॉल्वर डोक्याला लावून जातिवाचक शिवीगाळ करत ठार मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी तीन जणांविरुध्द विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना हत्तुरे वस्ती भाजी मंडई परिसरात घडली.

हत्तुरे वस्ती भाजी मंडईतील घटना



याप्रकरणी पीडित व्यक्तीने विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. याप्रकरणी सुरेश काडगावकर, सुरेखा काडगावकर, अप्पाशा उमदी (तिघे रा. सोलापुर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. पिडीत व्यक्ती आणि त्यांचा मावस भाऊ व त्यांचे साथीदार मिळून वाळूचे टेंडर विक्रीचे राहिलेले पैशाची मागणी करण्यासाठी काडगावकर यांच्या घराकडे गेले होते. त्यावेळी काडगावकर यांनी तुमची लायकी आहे का असे म्हणत जातीवाचक शिवीगाळ करत दमदाटी केली. त्यानंतर अप्पाशा उमदी याने माझ्याकडे रिवॉल्वरचे लायसन आहे. असे म्हणून रिवॉल्वर काढून डोक्यात लावून तुम्ही जर पुन्हा आमच्याकडे पैसे मागण्यास आला तर खल्लास करतो अशी धमकी फिर्यादी यांना दिली. असे फिर्यादीत म्हटले आहे. तपास सहायक पोलीस आयुक्त विभाग २ रेड्डी हे करीत आहेत.

## जिल्ह्यात सेवा पंधरवड्याचा शुभारंभ

### पहिल्या दिवशी २३ सातबारा व १५ रेशनकार्डचे वाटप



**सुराज्य/सोलापूर**

राज्य शासनाकडून १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२२ या कालावधीमध्ये राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले आहे. या अनुषंगाने नागरिकांनी १० सप्टेंबरपर्यंत प्रलंबित अर्जासाठी सेवा पंधरवड्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी केले शुभारंभाच्या पहिल्या दिवशी २३ सातबारा व १५ रेशनकार्डचे वाटप करण्यात आले

जिल्हाधिकारी कार्यालय येथील बहुउद्देशीय सभागृहात आज या अभियानाचा शुभारंभ शंभरकर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार, जिल्हा पुरवठा अधिकारी वर्षा लांडगे, अन्न धान्य वितरण अधिकारी सुमित शिंदे, दक्षिण सोलापूरचे तहसीलदार अमोल कुंभार, तहसीलदार दत्तात्रय मोहोळे, उत्तर व दक्षिण तहसिल कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. १० सप्टेंबर पर्यंत प्रलंबित असलेल्या अर्जावर या सेवा पंधरवड्यामध्ये योग्य तो निर्णय होऊन नागरिकांना विविध प्रकारचे दाखले, ७/१२ उतारे, फेरफार उतारे, रेशनकार्ड इत्यादी गोष्टींचा प्रशासनाकडून लाभार्थ्यांना लाभ दिला जाईल. जास्तीत जास्त नागरिकांनी आपल्या प्रलंबित अर्जासंदर्भात संबंधित कार्यालयाशी संपर्क साधून या सेवा पंधरवड्याचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हाधिकारी शंभरकर यांनी केले. यावेळी प्रातिनिधीक स्वरूपात दक्षिण तहसिल कार्यालयाकडून १० उतारे, ८ रेशनकार्ड तर उत्तर तहसिल कार्यालयाकडून १३ उतारे, ७ रेशनकार्ड असे एकूण २३ ७/१२, फेरफार व १५ रेशनकार्डचे वाटप शंभरकर यांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार यांनी केले तर सूत्रसंचालन तहसिलदार अमोल कुंभार यांनी केले.

## पंतप्रधान मोदींचा वाढदिवस बेरोजगार दिन म्हणून साजरा

**सुराज्य/सोलापूर**

पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांचा जन्मदिवस राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस शहर शाखेच्या वतीने राष्ट्रीय बेरोजगार दिन म्हणून साजरा करत डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात निषेध आंदोलन करण्यात आले.



अनेक वर्षांपासून विध्यार्थ्यांना तसेच युवकांना पंतप्रधान मोदी यांनी मेक इन इंडिया, मेड इन इंडिया, स्टार्टअप इंडिया अश्या अनेक फसव्या युवा रोजगाराच्या आश्वासनांचा पाऊस पडला होता परंतु ते प्रतक्ष्यात आजतागायत योजन दिसली नाही, त्यामुळे युवकांना सुशिक्षित बेरोजगार म्हणून समाजात वावरावे लागत आहे. त्यामुळे पंतप्रधाना जन्मदिनाच्या बेरोजगारमय शुभेच्छा देण्यासाठी व वाढत्या बेरोजगारिचा निषेध करण्यासाठी राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसच्या वतीने हे आंदोलन करण्यात आले राज्यामधील लाखो युवकांना नोकरी ची संधी उपलबध करून देणारा वेदांत फॉक्सऑन प्रकल्प गुजरातला नेण्यात आला याचा निषेध यावेळी करण्यात आला. सरचिटणीस अभिजित पाटील यांनी सांगितले यावेळी राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे शहराध्यक्ष निशांत सावळे, अक्षय जाधव, सागर भोसले, शाहरुख हुच्चे, जुबेर फुलारी, मिथुन लोखंडे, ओम अंडेली, करण मस्के, करण उघडे, प्रथमेश निंबाल, समर्थ भीमनरु, सिमतराज माने व आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## शहरात आज राज्यव्यापी मराठा आरक्षण परिषद

**सुराज्य/सोलापूर :** मराठा समाजाला आरक्षण तरतुदीच्या ५० टक्केच्या आत आरक्षण मिळावे, या मागणीसाठी आज रविवारी सोलापुरात राज्यव्यापी आरक्षण परिषद होणार आहे.


छत्रपती शिवाजी प्रशालेच्या राजर्षी शाहू सभागृहात सकाळी दहा वाजता ही परिषद होणार आहे. या आरक्षणाचा कसा लाभ घेतला जाऊ शकतो या विषयावर आरक्षणाचे अभ्यासक बाळासाहेब सराटे, ॲड. अभिजित पाटील, मा. शिवानंद भानूसे, ॲड. सुरेश गायकवाड मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी राम गायकवाड, राम साठे, उदय पाटील, मनीष सूर्यवंशी, प्रकाश ननावरे, विकास कदम, कृष्णा पवार, पोपट भोसले, विकी बाबा सुर्यवंशी, निखिल भोसले, किरण पवार यासाठी परिश्रम घेत आहेत.

## कोतमिरेंना थांबवण्यासाठी डीसीसीच्या कर्मचाऱ्यांनी ठोठावले सहकार आयुक्तांचे दार

### प्रशासकपद सोडण्याची शैलेश कोतमिरेंची इच्छा

**सुराज्य/सोलापूर**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे प्रशासक शैलेश कोतमिरे यांनी डीसीसी बँकेचे प्रशासकपद सोडणार असल्याची भावना गुरूवारी व्यक्त केली. मात्र त्यांनी प्रशासकपद सोडू नये. डीसीसीचा कारभार त्यांच्याकडेच ठेवा, या मागणीसाठी डीसीसीमधील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी शनिवारी पुणे येथील सहकार आयुक्तांकडे धाव घेतली. त्यामुळे सहकार आयुक्त यावर काय निर्णय घेणार आहेत ? याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.



प्रशासक कोतमिरे यांनी अचानक घेतलेल्या या निर्णयामुळे काही कर्मचाऱ्यांनी गुरुवारी 'साहेब तुम्ही थांबा, आम्ही तुमच्यासाठी मुख्यमंत्र्यांना भेटतो. प्रशासक म्हणून तुम्हीच कायम राहण्यासाठी जिल्ह्यातील नेत्यांनाही साकडे घालतो,' अशी विनवणी केली. दुसरीकडे प्रशासक कोतमिरे यांनी 'मी जिल्हा बँकेचे प्रशासकपद सोडावे, यासाठी माझ्यावर कोणाचाही दबाव नाही. हा माझा स्वत:चा निर्णय आहे,' असे त्यांनी सांगितले. तसेच अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या मागणीवर मी २ दिवसात विचार करून निर्णय घेणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अशातच येथील ठराविक अधिकारी, कर्मचाऱ्यांनी शनिवारी दुपारी ३ वाजता सहकार आयुक्त अनिल कवडे यांची पुणे येथे जाऊन भेट घेतली. यावेळी त्यांनी डीसीसीचा कारभार उत्तम चालला आहे. आर्थिक संकटात सापडलेल्या डीसीसी बँकेला आणखी काही दिवस प्रशासक म्हणून कोतमिरे यांची गरज आहे. त्यामुळे प्रशासक म्हणून कोतमिरे यांनीच काम पाहण्याचे आदेश द्यावेत, अशी भावना या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी सहकार आयुक्तांकडे बोलून दाखवली. यावर सहकार आयुक्त कवडे यांच्या निर्णयाकडे जिल्ह्याचे लक्ष लागून राहिले आहे.

### शेतकऱ्यांची देणी द्यायची कोणी ?

तत्कालिन चेअरमन तथा माजी आमदार राजन पाटील यांच्या अध्यक्षतेखालील मे २०१८ मध्ये संचालक मंडळ बरखास्त केले होते. त्यानंतर अप्पर निबंधक कोतमिरे यांनी सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या प्रशासकपदाची सुत्रे सप्टेंबर २०१८ मध्ये हाती घेतली. त्यानंतर त्यांनी माजी मंत्री दिलीप सोपल यांच्याशी निगडीत असलेल्या आर्यन शुगरकडे (ता. बार्शी) डीसीसी बँकेची ३६० कोटी रुपये येणेबाकी असल्याने या कारखान्याची ६८ कोटी रुपयांना विक्री केली. बीडचे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बजरंग सोनवणे यांनी हा कारखाना विकत घेतला. या कारखान्याकडे असलेली शेतकऱ्यांची देणी द्यायची कोणी ? हा प्रश्न सध्या चर्चेत आहे. अशातच प्रशासक पदावरून पुन्हा राजकारण सुरू असल्याची चर्चा सहकार क्षेत्रात सुरू आहे.

## बसय्या स्वामी यांचे निधन



**सुराज्य/सोलापूर :** मद्रे (ता. दक्षिण सोलापूर) येथील रहिवासी बसय्या कल्लय्या स्वामी यांचे शनिवार, दि. १७ सप्टेंबर रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. ते ८२ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, पाच मुली, सुना, जावई व नातवंडे असा मोठा परिवार आहे.

## जिल्हा दूध संघाला सुस्थितीत आणण्याचे प्रयत्न : शिंदे

**सुराज्य/सोलापूर**

सोलापूर जिल्हा दूध संघावर कर्जाचा मोठा डोंगर असून गेल्या ७ वर्षांपासून संघाला तोटा सहन करावा लागत आहे. या संघाला सुस्थितीत आणण्याचे मोठे आव्हान संचालक मंडळापुढे असून गेल्या ६ महिन्यांपासून आम्ही पारदर्शक कारभार करत आहोत. त्यात संचालक मंडळाला चांगले यश प्राप्त झाले असून प्रति लीटर तोटा कमी झालेला आहे. यापुढील काळातही संचालक मंडळासह अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना फार मोठे कष्ट करावे लागणार आहे, असे संघाचे अध्यक्ष रणजितसिंह शिंदे यांनी सांगितले.




संघाच्या कारभाराबाबत गेल्या २ दिवसांपासून बातम्या प्रसिध्द झाल्या. त्या पार्श्वभूमीवर शिंदे यांनी शनिवारी एक निवेदन प्रसिध्दीस दिले असून त्यात त्यांनी आशावाद व्यक्त केला आहे.

दि. ८ मार्च २०२२ पासून संघावर नूतन संचालक मंडळ कार्यरत आहे. या मंडळाने मागील ६ महिन्यांमध्ये अतिशय काटकसरीने व अभ्यासपूर्ण कामकाज करुन संघाच्या कारभारात अमूलाग्र बदल केला आहे. दुग्धजन्य पदार्थांच्या गुणवत्तेत सुधारणा केल्याने विक्रीत वाढ झाली आहे. दूध संकलनात वाढ झाली असून गुणवत्तेतही सुधारणा झाली आहे. शेतकऱ्यांच्या दुधास गुणवत्तेप्रमाणे दर देण्यासाठी संगणकिय कार्यप्रणाली विकसीत करुन दुधाच्या गुणवत्तेमध्ये पारदर्शकता आलेली आहे. बाजारपेठेतील स्पर्धेनुसार जास्तीत जास्त दर देण्यात येत असून शेतकऱ्यांना दूध बिले नियमितपणे अदा केली जात आहेत. तसेच कर्मचाऱ्यांचे वेतन सुरळीत करण्याचा प्रयत्न केलेला आहे, असे शिंदे यांनी सांगितले.



खर्चामध्ये बचत करण्यात आली आहे. कामकाजामध्ये कसूर करुन आर्थिक नुकसान केलेल्यांवर कडक कारवाई करण्यात आलेली आहे. चांगल्या प्रतीचे दूध घेण्याची खबरदारी घेतली जात असून आवश्यक ती टेस्टींग साहित्य खरेदी करण्यात आलेली आहे. असेही त्यांनी सांगितले.

## बँक शाखाधिकाऱ्यास मारहाण

### तिघांची निर्दोष मुक्तता

**सुराज्य/सोलापूर :** स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा सात रस्ता चे मॅनेजर पवन सुरेशकुमार तहीलीयानी यांना मारहाण करून सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकारणी व्दारकाप्रसाद दिगंबर उपलप, राहुल दिगंबर उपलप व कुणाल शंकरराव उपलप यांची जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. आर शिंदे यांनी निर्दोष मुक्तता केली.

२१ मार्च २०१८ रोजी स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा सातरस्ता येथे बँक मॅनेंजर म्हणून कार्यरत असणारे पवन तहीलीयानी हे त्यांचे बँकेत काम करीत असताना राहूल उपलप यांनी त्यांच्याशी हुज्जत घालून वाद घातला. त्यानंतर ते बँकेतून निघून गेले. त्याच दिवशी रात्री १० वाजता व्दारकाप्रसाद उपलप, कुणाल बोतल यांनी राहूल उपलप यांना खात्याची माहिती का दिली नाही म्हणून शिवीगाळ करून गच्ची पकडून मारहाण केली. या घटनेबाबत तहीलीयानी यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात रितसर फिर्याद दाखल केली. या प्रकरणात एकूण सहा साक्षीदार तपासण्यात आले. साक्षीदारांच्या साक्षीतील विसंगती व आरोपींच्या वकीलांचा युक्तीवाद ग्राह्य धरून जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. आर. शिंदे यांनी आरोपींची निर्दोष मुक्तता केली. यात सरकार पक्षातर्फे आर. जे. बुजरे तर आरोपींतर्फे ॲड. अभिषेक गुंड, ॲड. शांतीकुमार दुलंगे व ॲड. मनोहर गोविंदे यांनी काम पाहिले.

CMYK

## चुकीला माफी नाही

# बेशिस्त अधिकारी, कर्मचाऱ्यांवर रेकॉर्ड ब्रेक कारवाई

सुराज्य/सोलापूर

**'दगडी चाळ' चित्रपटातील डॅडी अर्थात मकरंद देशपांडे यांचा चुकीला माफी नाही या डॉयलॉग प्रचंड गाजला. डॅडीप्रमाणेच सोलापूरचे महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांचे काम सुरू आहे. त्यांचा एकच नियम, चुकला की ठोकला अर्थातच कारवाईचा बडगा. महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांनी वर्षभरात कामचुकार, बेशिस्त अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाईची चौफेर फटकेबाजी सुरूच ठेवली. महापालिका व शहराच्या हितासाठी काय पण! अशी जणू खूणगाठच त्यांनी बांधली आहे. त्यांनी बेशिस्त आणि कामचुकारपणा करणाऱ्या तब्बल ७३७ जणांवर दंडात्मकसह इतर प्रकारची रेकॉर्ड ब्रेक कारवाई केली आहे.**

दोन दिवसापूर्वी त्यांनी इंडो तिबेटियन वुलन मार्केट असोसिएशनला जागा देण्यासाठी बोगस करारपत्र करून परस्पर जागेची कब्जापावती दिल्याप्रकरणी महापालिकेच्या दोन कर्मचाऱ्यांना निलंबित केले. कामात गहाळपणा करणाऱ्या प्रभारी क्रीडाधिकाऱ्याला निलंबित केले.

आयुक्तांनी भ्रष्टाचार, घोटाळे उखडून काढले.





टँकरने पाणीपुरवठा असो वा इतर कोणतेही सर्व प्रकारची मक्तेदारी मोडीत काढण्याचा प्रयत्न केला. पाण्याबरोबरच आर्थिक गळतीही थांबवली. महापालिका आयुक्तांच्या या कारवाईच्या दणक्यामुळे का होईना, शिस्त आणि कामात सुसूत्रता निर्माण झाली. कोविड काळात महापालिका आयुक्तपदी पी. शिवशंकर हे रुजू झाले. नंतर कामाचा आढावा घेताना अनेक बाबी त्यांच्या निदर्शनास आल्या. महापालिका प्रशासनातील नेमकी नाळ आणि नाडी त्यांनी तपासली. त्यानंतर त्यांनी वेळोवेळी ऑपरेशन कारवाई राबविले.

गेल्या वर्षभरात सर्वाधिक मोठी कारवाई महापालिकेतील अधिकारी-कर्मचारी, कामगार, मानधनावरील कामगार-कर्मचाऱ्यांवर केली. या कालावधीत आयुक्तांनी कारवाई संदर्भातील २८४ आदेश काढले. यामध्ये सिंगल २२९ तर संयुक्तपणे ५५ कारवाईच्या आदेशातून ५०८ जणांवर अशा एकूण ७३७ जणांवर कारवाई केली. यामध्ये मात्र उपायुक्तांना सोडून कारवाईपासून इतर पदावरील कोणीही अधिकारी कर्मचारी वाचले नाही.

विविध विभागातील वारंवार मोठ्या चुका करणाऱ्या १० कर्मचाऱ्यांना चक्क घरचा रस्ता दाखविला तर काहींवर वारंवार दंडात्मक आणि समज देण्याची कारवाई केली. ही कारवाई करताना मानधनावरील कर्मचाऱ्यांना दंड तर कायम कर्मचाऱ्यांच्या वेतनाला कात्री लावण्याची कारवाई आयुक्तांनी विशेष आदेशाद्वारे केल्याने मात्र, महापालिकेत आयुक्तांच्या कारवाईचा धसका बसला.

महापालिका आयुक्तांच्या कारवाईच्या दणक्यापासून कोणीही सुटले नाही. त्यांनी सहाय्यक आयुक्तांबरोबरच नगर अभियंता, नगर रचना सहाय्यक संचालक, सार्वजनिक आरोग्य अभियंता, करप्रमुख, विधान सल्लागार, उद्यान अधीक्षक, मंडई अधीक्षक, क्रीडा अधिकारी, नगरसचिव, विभागीय अधिकारी, अग्निशामक दल प्रमुख, विद्युत विभाग सहाय्यक अभियंता, नेटवर्क ॲडमिनिस्ट्रेटर, जीवशास्त्रज्ञ, परिवहन उपक्रम कर्मशाळा अधीक्षक, अनेक विभागाचे अधीक्षक, अनेक उपअभियंता सहाय्यक अभियंता यांच्यावर देखील दंडात्मक कारवाई पार पडली आहे.

### ५ सहाय्यक आयुक्तांना थेट दंड

विशेष म्हणजे पाच सहाय्यक आयुक्तांवर दंडात्मक आणि अंतिम समज देण्याची कारवाई महापालिका आयुक्तांनी पार पाडली आहे. सहाय्यक आयुक्त सुनील माने आणि एन. व्ही. महानवर यांच्यावर अनेक वेळा दंडात्मक कारवाई झाली. सहाय्यक आयुक्त विक्रमसिंह पाटील आणि पुष्पगंधा भगत यांच्यावर देखील दोन दोन वेळा अंतिम समज देण्याची कारवाई झाली तर सहाय्यक आयुक्त श्रीराम पवार यांनाही एकदा मिळकत कर वसुलीच्या बाबतीत समज देण्याची नोटीस वजा कारवाई केली आहे. इथे 'नियम एकच काम म्हणजे काम आणि शिस्त म्हणजे शिस्त!'

### अनेकांना घरचा रस्ता दाखविला

महापालिका आयुक्तांनी महापालिकेतील विविध विभागातील प्रमुखांसह इतर तब्बल ९ जणांना घरचा रस्ता दाखविला. आवेक्षक बागेवाडीकर यांना शिवाय मानधनावरील आवश्यक राजकुमार मेश्राम, पंकज उपाध्ये, प्रशांत गुंड यांची सेवा समाप्त करण्यात आली. वैद्यकीय अधिकारी डॉ. पल्लोलू, डॉ. फिरोज मुलाणी, उद्यान अधीक्षक निशिकांत कांबळे, सहाय्यक उद्यान अधीक्षक चव्हाण, विश्वास शिंदे, निर्मल कीपर, अजय मस्के, शहर अभियान व्यवस्थापक वैशाली आव्हाड यांची सेवा समाप्त करण्याची कारवाई करण्यात आली. ९ विभागीय अधिकाऱ्यांवर देखील कारवाई करण्यात आली.



# स्वच्छ अमृत महोत्सवांतर्गत केंद्रस्तरीय स्वच्छता रॅली

सुराज्य/सोलापूर

मनपा मुलांची शाळा क्र २६ या केंद्राच्या वतीने स्वच्छ अमृत महोत्सव अंतर्गत केंद्रस्तरीय स्वच्छता रॅली काढण्यात आली.

रॅलीचे उद्‌घाटन केंद्र प्रमुख रजनी राऊळ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी श्रीदत्त मराठी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका संगीता शिवपुजे, साने गुरुजी प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका सुरेखा चौधरी, श्रीदत्त प्रशालेचे मुख्याध्यापक भारत घोडके आदी उपस्थित होते. या रॅलीची सुरुवात तिमप्पा शाळेसमोरील मैदान-मार्ग- मार्कंडेय नगर, माधव नगर, आकाशवाणी केंद्र, शेवट श्रीदत्त विद्यालय प्रांगणच्या परिसरात काढण्यात आली.

या रॅलीत सरस्वती तिमप्पा, अहिल्याबाई प्रशाला, सानेगुरुजी शाळा , मौनेश्वर शाळा, सुर्यकांत बोगार, श्रीदत्त मराठी विद्यालय आदी शाळा सहभागी झाल्या होत्या.

या रॅलीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी स्वच्छतेचा संदेश दिला. यावेळी सर्व विद्यार्थ्यांना व शिक्षकांना स्वच्छतेची शपथ देण्यात आली.

# सेनेचे ४० फुटले, त्यासमोर आम्ही काही नाही

## वंचितच्या प्रदेशाध्यक्षा ठाकूर यांचे प्रतिपादन

सुराज्य/सोलापूर

प्रत्येक पक्षात गटबाजी असते. ती थांबवणे गरजेचे आहे. पदाधिकाऱ्यांनी कार्यकर्त्यांच्या प्रश्न समस्या ऐकल्या पाहिजे, जरी वंचितचे काही पदाधिकारी सोडून गेले असले तरी आम्हांला काही फरक पडणार नाही, शिवसेनेचे तर ४० फुटले त्यासमोर आम्ही काही नाही, असे वंचित बहुजन आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष रेखा ठाकूर यांनी म्हणत पक्ष सोडून गेलेले जर पुन्हा येत असतील तर आम्ही त्यांचे स्वागत करू असे सांगितले.

वंचित बहुजन आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष रेखा ठाकूर या शुक्रवारी सोलापूर दौऱ्यावर होत्या. त्यांच्या उपस्थितीत सोलापुरात सत्ता संपादन मेळावा घेण्यात आला. त्यानंतर त्या सायंकाळी शासकीय विश्रामगृहात थांबल्या असता पत्रकारांशी त्यांनी गप्पा मारल्या.

मेळाव्याच्या तोंडावरच शहराध्यक्ष हजरत अली बडेखान, शहर युवक अध्यक्ष अमर ज्ञानदेव पवार यांनी राजीनामे दिले तसेच जिल्हा युवकाध्यक्ष जावेद पटेल यांनी पक्ष सोडून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना गटात प्रवेश केला. हा प्रश्न ठाकूर यांना विचारला असता त्यांनी वरील उत्तर दिले. त्या पुढे म्हणाल्या, 'संपूर्ण महाराष्ट्रात टप्प्याटप्प्याने सर्व जिल्ह्यात दौरा नियोजित आहे. गेल्या वर्षभरात मोठ्या पद्धतीने आम्ही संघटना बांधणी केली आहे. तालुक्यातील बांधणी पूर्ण झाली असून जिल्हा परिषद गणानुसार आता तयारी करण्यात येत आहे.



या संपूर्ण प्रक्रियेत कार्यकर्त्यांसोबत संवाद आवश्यक असून त्यांना मार्गदर्शन करण्याची गरज असते. म्हणून सत्ता संपादन मेळाव्याच्या माध्यमातून संघटना बांधणी करीत आहोत.

# देशाच्या जडणघडणीत अभियंत्यांचे महत्त्वाचे योगदान : बिडकर




सुराज्य/सोलापूर

**देशाच्या जडणघडणीत अभियंत्यांचे मोठे योगदान आहे. आजच्या आधुनिक युगात देशाच्या विकासात उत्कृष्ट अभियंत्यांचा मोलाचा वाटा आहे. देशाची प्रगती व विकास हे प्रतिभावान अभियंताशिवाय शक्य नाही.**

अभियंता म्हणून ज्यांनी अतिशय काम चांगले केले आहे. त्यांना भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जयंतीचे औचित्य साधून औद्योगिक प्रशिक्षण संस्था सोलापूर यांच्यावतीने 'आदर्श अभियंता' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे, असे प्रतिपादन मनोज बिडकर यांनी केले.

सोलापूर येथे भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांची जयंती साजरी करण्यात आली. जयंतीचे औचित्य साधून औद्योगिक प्रशिक्षण संस्था सोलापूर यांच्यावतीने सचिन जाधव सहाय्यक आयुक्त जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योग जगता मार्गदर्शन केंद्र यांच्या उपस्थितीत आणि मनोज बिडकर प्राचार्य औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांच्या अध्यक्षतेखाली चंद्रकांत दिघे, महावितरण कंपनी शहर ई उपविभागाचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता रूपेश जाधव, रेल्वे विद्युत विभाग अभियंता विकास लोंढे, सार्वजनिक बांधकाम विभाग अभियंता सोलापूर तसेच प्रदीप वाघचौरे पाटबंधारे विभाग शाखा अभियंता सोलापूर आदी चार अभियंत्यांना प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी महावितरणचे संजय भोसले, नाजीरोद्दीन मुजावर, सुनील काळे, रमेश कुंभार, अनिलकुमार बनसोडे, दत्तात्रय गुंड, निलकंठ कांबळे, बालाजी जाधव, किरणकुमार इरनाळे, महादेव वकिटोळू, आनंद फुलारी, नितीन कोळी, अक्षय कांबळे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कोनाळे आणि कुंभार यांनी केले.

### पीर रहीमबाबा अन्सारींचा ६२ वा ऊर्स

# सोमवारपासून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

**सुराज्य/सोलापूर : मुस्लीम पाच्छापेठेतील प्रसिद्ध सुफी संत हजरत पीर अब्दुर्रहीमबाबा अन्सारी यांचा ६२ वा ऊर्स शरीफ महोत्सव येत्या १९ सप्टेंबरपासून चार दिवस साजरा होत आहे. या ऊर्स महोत्सवाचे प्रमुख आकर्षण दोन दिवसीय कव्वाली मैफल राहणार आहे.**



मुस्लीम पाच्छा पेठेत हजरत पीर अब्दुर्रहीमबाबांच्या दर्गाहमध्ये होणाऱ्या या ऊर्स महोत्सवात १९ सप्टेंबर रोजी रात्री आठ वाजता दर्गाहच्या गौसिया मन्झील अरबी मदरशातील मुला-मुलींच्या वक्तृत्व स्पर्धा, नात गायन, कुराण पठण आदी कार्यक्रम होतील. दि. २० रोजी 'संदल'चा विधी होणार असून तत्पूर्वी रात्री आठ वाजता बाबांच्या समाधिस्थळापासून संदलची शोभायात्रा निघणार आहे. शोभायात्रा गौसिया मन्झीलमध्ये परतल्यानंतर बाबांच्या पवित्र समाधीला संदल अर्पण केले जाईल. त्यानंतर कव्वालीची मैफल होणार आहे. दुसऱ्या दिवशी , दि. २१ सप्टेंबर रोजी 'चिरागा' च्या (दीपोत्सव) मुख्य कार्यक्रमातही कव्वालीची मैफल होणार आहे. दोन्ही मैफलीत असरार नाझा आणि शाहीद अजमेरी (अहमदनगर), इस्माईल निझामी (इंदापूर), मुन्ना-मोईन (सोलापूर) यांचा सहभाग राहणार आहे.

या ऊर्सच्या पूर्वीपासून म्हणजे बाबांच्या हयातीपासून गौसिया मन्झीलमध्ये कव्वाली मैफलीची परंपरा अखंडपणे चालत आली आहे. मास्टर हबीब नगरी निझामी हे स्वतः अखेरपर्यंत या सोहळ्यात हजेरी लावत असत. त्यांच्या पश्चात त्यांचे पट्टशिष्य अलिमोद्दीन निझामी, अ. सत्तार निझामी, अयुब निझामी, हाशम निझामी, दिलावर निझामी या दुसऱ्या पिढीने मैफलीची परंपरा पुढे नेली. त्यानंतर आता ही परंपरा तिसऱ्या पिढीने जोपासली आहे. २१ रोजी डॉ. हाफिज जुनैदी यांचे मोफत आरोग्य शिबिर आणि रक्तदान शिबिरही आयोजिले आहे. २२ सप्टेंबर रोजी सकाळी जियारतीच्या धार्मिक विधीने ऊर्सची सांगता होणार आहे. या ऊर्स शरीफमधील सर्व कार्यक्रमात सर्व भाविकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन हजरत पीर अब्दुर्रहीम बाबा अन्सारी दर्गाह विश्वस्त समितीचे अध्यक्ष मुदस्सर शरफोद्दीन शेख यांनी केले आहे.

## पाण्याची मोटर बंद करण्याच्या कारणावरून धमकी

सुराज्य/सोलापूर : गच्चीवरील पाण्याची टाकी भरली आहे का नाही हे पाहण्यासाठी जात असताना दमदाटी करून पाण्याची मोटर बंद केल्याच्या कारणावरून धमकी दिल्याची घटना दि.१३ सप्टेंबर रोजी सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास झवर मळा जुना पुना नाका येथे घडली.

याप्रकरणी गोविंद लक्ष्मीनारायण राठी (वय-२७, रा. लक्ष्मीनारायण बिल्डिंग, झवर मळा) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून प्रियांका श्रीकांत कामूर्ती (रा. लक्ष्मीनारायण बिल्डिंग) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी व संशयित आरोपी हे एकाच बिल्डिंगमध्ये राहतात. राठी हे गच्चीवर पाण्याची टाकी भरली आहे का हे पाहण्यासाठी जात होते. त्यावेळी प्रियांका कामूर्ती यांनी त्यांना अडवून वर जायचे नाही, अशी दमदाटी केली. तसेच पाण्याची मोटर बंद करण्याच्या कारणावरून राठी यांना धमकी दिली आहे, असे फिर्यादीत म्हटले आहे. तपास पोलीस नाईक पवार हे करीत आहेत.

## 'शिवबा'तर्फे सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा

सुराज्य/सोलापूर : सालावादाप्रमाणे इंदाई शिवबाबा बहुद्देशीय समाजसेवी संस्थेच्यावतीने सर्व धर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन दि. १४ डिसेंबर रोजी सायंकाळी सव्वा सात वाजता या गोरज मुहूर्तावर आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती संस्थेचे निरंजन बोब्दूल यांनी पत्रकार परिषदेत दिली.

नाव नोंदणीसाठी शिवबा संपर्क कार्यालय, अशोक चौक येथे भ्रमणध्वनी ९५८८४९०२७४ तसेच ८४२१३७७८७७ या नंबरवर संपर्क करावा, असे आवाहन करण्यात आले. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष निरंजन बुद्रुक, विष्णू सुदर्शनाचार्य, प्रभाकर गाजला, नागेश शरद आदी उपस्थित होते.

## वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या हातगाडी चालकांवर कारवाई

सुराज्य/सोलापूर

वाहतुकीस अडथळा करणाऱ्या हातगाडी चालकांवर कारवाई करून त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर बाजार पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गेंट्याल चौक येथ हातगाडी चालकाने रस्त्याच्या मधोमध गाडी थांबून विक्री करत असताना मिळून आला आहे.

याप्रकरणी पोलीस शिपाई अबरार महंमद शुकूर दिंडोरे यांनी फिर्याद दाखल केली आहे. अजय राजू साठे (वय-२८, रा. न्यू पाच्छा पेठ, सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. दुसरी घटना ही विजापूर नाका पोलीस ठाण्याच्या हद्दीत मोहन नरसिंग चव्हाण (वय-४०, रा. नेहरूनगर) व पोलीस शिपाई नितीन भगवान गायकवाड यांच्या फिर्यादीवरून रईस रजाक जमादार (वय-५२, रा. शनिवार पेठ) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

मोहन चव्हाण व रईस जमादार त्याच्या ताब्यातील हातगाडीवर फळ विक्री करत असताना सार्वजनिक रस्त्यावर वाहतुकीस अडथळा होईल, अशा स्थितीत मिळून आले आहे.

या घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक गायकवाड व शेळके हे करीत आहेत.

# आदर्श अभियंता पुरस्काराने वाघमारे सन्मानित

## आदर्श अभियंता म्हणून पी. एम. वाघमारे यांची सर्वत्र प्रशंसा

सुराज्य/सोलापूर

**राज्य शासनाच्या उत्कृष्ट अभियंता पुरस्काराने आटपाडी तालुक्यातील राजेवाडीच्या सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता पी. एम. वाघमारे व दिपाली वाघमारे यांचा सपत्नीक मुंबई येथे सन्मान करण्यात आला.**

मुंबई येथील षण्मुखानंद हॉलमध्ये भारतरत्न मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जन्मदिनानिमित्त अभियंता दिनी सार्वजनिक बांधकाम खात्याचे मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते पी. एम. वाघमारे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

यावेळी सार्वजनिक बांधकाम खात्याचे अतिरिक्त मुख्य सचिव मनोज सौनिक, सचिव एस. एस. साळुंखे, सचिव पी. डी. नवघरे, रस्ते विकास महामंडळाचे सचिव अनिल गायकवाड, सचिव के. टी. पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. वाघमारे यांनी १९८० मध्ये पंढरपूर येथून सेवाकाळ सुरू केला. पुढे १९८६ ते १९९९ पर्यंत माळशिरस तालुक्यातील नातेपुते येथे शाखा अभियंता म्हणून उत्तम काम केले.



२०१५ साली कार्यकारी अभियंता झालेल्या पी. एम. वाघमारे यांच्या कार्याचा केंद्रीयमंत्री नितीन गडकरी, माजी मंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, माजीमंत्री हर्षवर्धन पाटील, दिवंगत माजीमंत्री प्रतापसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्तेही यापूर्वी गौरव झाला आहे. ३९ वर्षे इतक्या प्रदीर्घ काळात सार्वजनिक बांधकाम खात्यात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल तसेच सामाजिक कामामध्येही अग्रेसर राहिल्याने पद्मश्री तात्याराव लहाने यांच्या हस्ते उत्कृष्ट प्रशासक म्हणून बेस्ट एक्सलन्स ॲवार्डने ही पी. एम. वाघमारे यांना गौरविले होते.

अकलूज येथे कार्यकारी अभियंता म्हणून कार्यरत असताना त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला शिस्त लावली. उत्कृष्ट कार्य केले त्यामुळे त्यांच्या कार्याची आजही अकलूज परिसरात चर्चा होते. आदर्श अभियंता म्हणून सन्मानित झालेल्या पी. एम. वाघमारे यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.


CMYK

# नाटकांमध्ये चांगला बदल घडतोय

## श्रमिक पत्रकार संघाच्या वार्तालापात अभिनेते डॉ.गिरीश ओक यांचे मत

✔ सुराज्य/सोलापूर

पूर्वी प्रायोगिक व व्यावसायिक रंगभूमी असे दोन प्रवाह होते. आजही ते आहेत. परंतु आज नाटकांचा कालावधी कमी झाला असला तरी आशय व विषयाची मांडणी चांगली होत आहे. त्यामुळे नाटकांमध्ये चांगले बदल घडून येत असल्याचे समाधान ज्येष्ठ चित्रपट व नाट्य अभिनेते डॉ. गिरीश ओक यांनी व्यक्त केले.



सोलापूर श्रमिक पत्रकार संघातर्फे शनिवारी आयोजित वार्तालाप कार्यक्रमात डॉ. ओक बोलत होते. प्रारंभी श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी मंचावर ज्येष्ठ नाट्य कलावंत जयप्रकाश कुलकर्णी, प्रशांत बडवे, लेखक शिरीष देखणे, अमोल धाबळे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. ओक पुढे म्हणाले, १९८४ साली या क्षेत्रात पदार्पण केले. या कारकिर्दीस ३८ वर्ष पूर्ण होत आहेत. मला नट म्हणून आव्हानात्मक असं ३८ कृष्ण व्हीला हे मला पन्नासावं नाटक मिळालं. अशा प्रकारची भूमिका मी पहिल्यांदाच करत आहे. रहस्य प्रधान असलेले हे नाटक आव्हानात्मक असल्याचे त्यांनी सांगितले. यासाठी एक लाखाच्या वर प्रेक्षकांनी बुकिंग केल्याचे सांगितले.

५० व्या नाटकाच्या निमित्ताने सोलापुरात श्रमिक पत्रकार संघाच्या वतीने हा सत्कार होत आहे, याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. तो मी नव्हेच या प्रभाकर पणशीकरांच्या नाटकांचा प्रयोग करताना वेगळा अनुभव आला. आनंद व भीतीची भावना होती. १०० वा प्रयोग आम्ही दोघे एकत्र करायचे ठरविले होते पण तत्पूर्वी दुर्दैवाने त्यांचे निधन झाले. त्यामुळे दोन लखोबांचा एकत्रित प्रयोग करायचे राहून गेल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. लावण्यवती या चित्रपटातील पट्टे बापूराव यांची भूमिका साकारण्याचा अनुभव वेगळा होता. डॉक्टरची पदवी घेतली मात्र अभिनय क्षेत्रात जास्तच रुळलो. एक सीट वाया घालवली असे अनेक जण म्हणतात, त्याबद्दल माफी मागतो मात्र अभिनेता म्हणून जॉब सॅटिसफॅक्शन अधिक मिळाल्याची भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली. कोरोना काळातील लॉकडाऊन निर्बंधाचा काळ अधिक कठीण व भयावह होता. कलावंतांची भयंकर विचित्र अवस्था होती. माझीही तीन महिने तशीच अवस्था होती. नाटक कधी होणार असे सर्वांना वाटत होते. त्यानंतर आता पूर्ववत स्थिती निर्माण झाली आहे. प्रेक्षकही याकडे वळत आहेत याचा आनंद वाटतो. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन अश्विनी तडवळकर यांनी केले.

### सोलापूरचे हुतात्मा स्मृती मंदिर माझे लाडके थिएटर

सोलापुरातील हुतात्मा स्मृती मंदिर हे माझे लाडके थिएटर आहे. इथले प्रेक्षकही चांगले आहेत. अनेक वेळा मी इथे आलो. सोलापूरवर ही माझे विशेष प्रेम आहे. नाट्य आराधनाच्या माध्यमातून अनेक वेळा अनेक मित्र जोडता आले. येथील खाद्यपदार्थ, मित्रमंडळी, व्यासंगी लोक यांच्या समवेत राहता आले, याचेही समाधान वाटते, असे ते म्हणाले.

# आयशर टेंपोची ताडपत्री फाडून ९३ हजारांचे कपडे केले लंपास

## देवडी पाटीजवळ घडली घटना

✔ सुराज्य/मोहोळ

सोलापूर-पुणे महामार्गावर देवडी पाटीजवळ आयशर टेम्पो मधील दोन कॉटन कपड्याच्या डाग काढून ९३ हजारांची लूट करण्यात आली याबाबत अज्ञात चोरट्या विरोधात मोहोळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

अक्षय गेजगे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार ते व त्यांच्यासोबत असणारा चालक समाधान सुतार असे दोघे मिळून आयशर टेम्पोवर ड्रायव्हर म्हणून काम करत होतेहा टेम्पो भीमराव पाटलोबा पवार (रा. फुलचिंचोली तालुका पंढरपूर) यांच्या मालकीचा आहे. आयशर टेम्पो क्रमांक २५८९यामध्ये आमदाबाद गुजरात येथून गिरनार ट्रान्सपोर्ट कोंडी येथे उतरण्यासाठी कॉटन कपड्याचे डाग २१९ भरण्यात आले होते १६ ऑगस्ट रोजी पहाटे चहा पिण्यासाठी ड्रायव्हरने गाडी चहा टपरी जवळ उभा केला चहा घेतला व झोप लागल्याने थोडा वेळ झापला असता २ ते २ .४५ वाजणेच्या सुमारास पाठीमागील बाजूची ताडपत्री वाऱ्याने उडू लागली म्हणून मागे जावून पाहिले. ताडपत्री कापलेली दिसली यावरून गाडीतील माल कोणीतरी ताडपत्री कापून चोरून नेल्याचा संशय आला. याबाबत गेजगे यांनी त्यांचे सहकारी समाधान सुतार यांना उठवून घडला प्रकार सांगितला. दोघांनी मिळून टेम्पो मालकास फोन लावून ही घटना सांगितली मालकाने याबाबत ट्रान्सपोर्ट ला फोन लावून कळवा असे सांगितले त्यांनी ट्रान्सपोर्ट ला फोन लावून याबाबतची कल्पना दिली असता नेमका माल कोणता गेला व किती गेला याची खात्री करण्यासाठी माल उतरवून घेतला व यात दोन डाग कमी दिसून आले याबाबत गेजगे यांनी मोहोळ पोलिस ठाण्यात येवून कॉटन कपडयाच्या दोन डाग किंमत ९३ हजार रुपये अज्ञात चोरांनी चोरून नेल्याची फिर्याद दाखल करण्यात आली या घटनेचा तपास मोहोळ पोलिस करित आहेत.





## रक्तदानासारखा उपक्रम सर्वांच्याच हिताचा : सायकर

✔ सुराज्य/मोहोळ : वाढदिवसानिमित्त अन्य उपक्रम करण्यापेक्षा रक्तदाना सारखा उपक्रम करणे हे सर्वांच्याच हिताचे आहे, असे प्रतिपादन मोहोळचे पोलिस निरीक्षक अशोक सायकर यांनी केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या दरम्यान सेवा पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले आहे. त्या निमित्त आयोजित करण्यात आलेल्या या प्रथम कार्यक्रमाचे रक्तदान शिबिराचे उद्घाटन त्यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी भाजपचे तालुकाध्यक्ष सुनिल चव्हाण होते. यावेळी लोकसेवक संजय क्षीरसागर, तालुका सरचिटणीस रमेश माने, सतीश पाटील, युवा नेते अँड् राजन डोंगरे, भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष प्रकाश घोडके, पांडुरंग बचुटे, बाबासाहेब जाधव, फंटू गोफणे, दिलीप गायकवाड, मुजीब मुजावर, अंकुश अवतडे विशालसिंह पवार, महेश धुमाळ, जगन्नाथ वसेकर, सौदागर खडके, उपस्थित होते उपस्थित होते महिला आघाडीचे माजी तालुकाध्यक्ष अंजली काटकर, सादिक तांबोळी, नितीन सोनटक्के, शशिकांत गावडे, आनंदा गावडे, संजय वाघमोडे, अनु. जाती मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष नागेश क्षीरसागर, अविनाश पांढरे, सुशील क्षिरसागर गणेश झाडे आत्माराम राठोड आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी ५३ जणांनी रक्तदान केले. प्रास्ताविक शहराध्यक्ष तथा माजी नगरसेवक सुशील क्षीरसागर यांनी केले. सूत्रसंचालन तालुका सरचिटणीस महेश सोवनी यांनी केले.

# जाधव पिता-पुत्रांना मध्यप्रदेश येथे आमंत्रण

✔ सुराज्य/सोलापूर

भारत सरकार प्रणित सांस्कृतिक मंत्रालय मध्यप्रदेश विभाग व शासकीय संगीत महाविद्यालय, मदसौर मध्यप्रदेशच्या संयुक्त विद्यमानाने संगीत मुर्धन्य. पंडित विष्णु नारायण भातखंडे स्मृर्ती प्रसंग पंडित भिमण्णा जाधव मास्टर व्यंकटेशकुमार जाधव पिता-पुत्र यांना निमंत्रण केले आहे.

१९ सप्टेंबर रोजी होणाऱ्या संगीत मूर्धन्य पंडित विष्णु नारायण भातखंडे संगीत समारोह मध्ये पिता-पुत्र यांचे सुंदरीवाद्य वादनाचे कार्यक्रम सादरीकरण होणार आहे. सोलापूरचे तबला वादक पं. नितीन दिवाकर,





हे तबला वादन साथ करणार आहेत. मास्टर व्यंकटेशकुमार जाधव दमाणी विद्या मंदिर येथे इयत्ता. ६ वी मध्ये शिकत आहे.

पंडित भिमण्णा जाधव, सुंदरीसाम्राट सिद्राम जाधव यांचे नातु व पंडित चिदानंद जाधव यांचे चिरंजीव आजतागायत भारतातील प्रतिष्ठीत संगीत समारोहामध्ये सुन्द्री वादनाची सेवा करत सुन्द्री वाद्यास सातासमुद्रापलिकडे पोहचविण्यास भिमण्णा यांचा सिंहाचा वाटा आहे. बेल्जियम व फान्स येथे फिमु फेस्टिव्हल करीता भारताचे सांस्कृतिक प्रतिनिधी म्हणून निवड झाली होती. २६ जानेवारी २०१३ प्रजासत्ताक दिनानिमित्त आकाशवाणी अखिल भारतीय कार्यकमातून सर्वच आकाशवाणी केंद्रातून एकाच वेळी भिमण्णा जाधव यांचे सुन्द्री वादन प्रसारित झाले होते. ऑल इंडिया रेडिओचे ए वर्ग श्रेणीचे कलावंत आहेत. आतापर्यंत त्यांना भारतातील प्रतिष्टित पुरस्कार, फेलोशिप, स्कॉलरशिपने सन्मानित करण्यात आले आहे.

# दिलीप स्वामी यांना आदर्श कर्मचारी पुरस्कार

✔ सुराज्य/सोलापूर : महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी महासंघातर्फे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांना कर्मचारी आदर्श पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. उमेशचंद्र चिलबुले यांना कर्मचारी शिरोमणी पुरस्कार, अतिरिक्त सीईओ संतोष धोत्रे यांना कर्मचारी गौरव पुरस्कार, महासंघाचे यशवंत गवळी यांना कर्मचारी सेवा पुरस्कार तसेच दैनिक सुराज्याचे प्रतिनिधी बळीराम सर्व गोड यांना कर्मचारी मित्र पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. अशी माहिती महासंघाचे जिल्हाध्यक्ष राजेश देशपांडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी विविध पुरस्कारांचे वितरण आमदार समाधान अवताडे, माजी आमदार प्रशांत परिचारक, संघटनेचे राज्याध्यक्ष उमेशचंद्र चिलबुले यांच्या हस्ते वितरण होणार आहे. पंढरपुरातील दिंडीमार्ग येथील फडताळे सभागृह येथे दुपारी दोन वाजता कृतज्ञता सन्मान सोहळा आयोजित केला आहे.

# टेम्पोच्या धडकेत दोघेजण जखमी

✔ सुराज्य/सोलापूर

**टेम्पो चालकावर गुन्हा दाखल**

भरधाव वेगात निघालेल्या विटाने भरलेल्या टेम्पोने दुचाकीला पाठीमागून धडक देऊन दुचाकी वरील दोघेजण गंभीर जखमी झाल्याची घटना दि. ४ सप्टेंबर रोजी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास सोलापूर पुणे हायवे रोडवरील धोत्री कडे जात असताना बाळे ब्रिजवर घडली. याप्रकरणी महादेव दत्तात्रय त्र्यंबके ( वय-१९, रा. मु. पो. अकोले. ता. इंदापूर जिल्हा. पुणे) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून टेम्पो क्रमांक एम. एच. १३. पी. १९७२ या टेम्पोच्या चालकाविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.

फिर्यादी व फिर्यादी यांच्या वडिलांचे मामा विठ्ठल मनोहर शिंदे (वय-६५) हे त्यांची मोटारसायकल क्रमांक एम. एच. ४६. एडब्लू. ५६७५ वरुन पुणे-सोलापुर हायवे रोडवर धोत्रीकडे जात असता बाळे ब्रिज जवळ आले असता विटाने भरलेल्या ट्रकने फिर्यादी यांच्या दुचाकीला धडक देऊन गंभी जखमी केले. घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक कसबे हे करीत आहेत.

# अक्कलकोट तालुका आधार कार्ड लिंकिंगमध्ये जिल्ह्यात दुसरा

✔ सुराज्य/अक्कलकोट :अक्कलकोट तालुक्यात सध्या मतदान कार्ड ला आधार कार्ड लिंक करण्याचे काम युध्दपातळीवर सुरु आहे. तालुक्याचा आधार कार्ड लिंकिंग मध्ये जिल्ह्यातील सर्व मतदार संघात अक्कलकोट तालुका दुसरा क्रमांकावर असल्याचे तहसीलदार बाळासाहेब सिरसट यांनी सांगितले.



सिरसट म्हणाले की, मतदान कार्डाला आधार लिंक झाल्याचे प्रमाण सध्या ३५ टक्के आहे. हे काम मतदान केंद्र स्तर अधिकारी यांच्यामार्फत गरुडा अँप मधून व गाव स्तरावर कोतवाल, पोलीस पाटील यांच्या सहकार्याने वोटर हेल्पलाइन अँप मधून करण्याचे काम सुरू आहे. मतदारांनी आपले मतदान व आधार कार्ड स्वतःचे मोबाईल नंबर त्यात नमूद करून बी एल ओ, कोतवाल किंवा पोलीस पाटील यांच्याकडे द्यावे. जुने मतदान कार्ड, ओळखपत्र असेल तर गरुडा अँप व वोटर हेल्पलाइन अँप मध्ये दिसत नसल्या बाबत तहसील कार्यालयाकडे तक्रार प्राप्त झाले आहेत. त्यामुळे सदर मतदारांची मतदान कार्ड आधार कार्डशी लिंक करण्यामध्ये अडचणी येत आहेत. अशावेळी दोन पर्याय असून,त्यात पहिला पर्याय हा गुगलला, क्रोम मध्ये वोटर सर्च लिंक ओपन करून आपले नाव सर्च करता येते. व दुसरा पर्याय संबंधित भागाचे बीएलओ यांच्याकडे अद्यावत मतदार यादी आहे त्यांच्याशी संपर्क करून माहिती घेण्याचे आवाहन तहसीलदार बाळासाहेब सिरसट यांनी केले आहे



## आ. प्रणिती शिंदे यांच्याकडून सुवर्णपदक विजेत्यांचा सत्कार

✔ सुराज्य/सोलापूर : राष्ट्रीय बेसबॉल स्पर्धेत सुवर्णपदक मिळविलेल्या सोलापूरच्या अक्षय हावळे व सिताराम भांड या खेळाडूंचा सत्कार आमदार प्रणिती शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. ८ ते १२ सप्टेंबर दरम्यान लवली प्रोफेशनल युनिव्हर्सिटी, फगवाडा, पंजाब येथे झालेल्या सीनियर राष्ट्रीय बेसबॉल अजिंक्यपद स्पर्धेमध्ये महाराष्ट्र बेसबॉल संघाने सुवर्णपदक प्राप्त पटकावले. या संघात सोलापूरच्या अक्षय हावळे व सिताराम भांड यांचा समावेश आहे. या संघामध्ये अक्षय हावळे याने थर्ड बेस करून उत्कृष्ट हीटिंग केली. तर सिताराम भांड यांनी उत्कृष्ट पिचिंग करून संघास विजेतेपद पटकावण्यामध्ये मोलाची कामगिरी केली. या खेळाडूंना अशोक सरोदे, प्रा. संतोष गवळी, प्रा. संतोष खेंडे, मारुती घोडके यांनी मार्गदर्शन केले. या खेळाडूंचे महाराष्ट्र बेसबॉल संघटनेचे महासचिव राजेंद्र इखनकर, ज्ञानेश काळे, राजेंद्र बनसोडे, सोलापूर शहर व जिल्हा बेसबॉल संघटनेचे अध्यक्ष विनोद भोसले, सहसचिव प्रवीण बिराजदार, राजाराम शितोळे, प्रशांत राणे, गंगाराम घोडके, प्रशांत कदम व शिवाजी वसपटे यांनी अभिनंदन केले.

### अण्णाभाऊ साठे जन्मशताब्दीनिमित्त
## पोखरापूरमध्ये गौरव मेळावा

✔ सुराज्य/मोहोळ : लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जन्मशताब्दी निमित्त देशभर विविध कार्यक्रम साजरे होत आहेत. पोखरापूर (ता मोहोळ )येथेही गौरव मेळावा झाला

पोखरापूर येथील सरपंच, उपसरपंच आणि ग्रामपंचायत सदस्य व समाज बांधव यांच्या वतीने गौरव मेळाव्याचे आयोजन केले होते. यावेळी लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न किताब मिळण्यासाठी सर्व ग्रामपंचायत मध्ये ठराव घेऊन राज्य शासनास सादर करावेत, असे आवाहन सत्यवान खंदारे यांनी केले. तसेच श्रीधर उन्हाळे व संतोष मोरे यांनी असाठे यांच्या कार्याची माहिती सांगितली. या कार्यक्रमासाठी सरपंच नंदा लेंगरे, उपसरपंच आशिष आगलावे, ग्रामपंचायत सदस्या शामल खंदारे, हर्षद दळवे, दत्तात्रय काकडे, आप्पाराव खंदारे, ब्रह्मदेव माने, रघुनाथ झांबरे दत्तात्रय खंदारे, अंकुश दळवे, बालाजी उन्हाळे, दुर्योधन खंदारे, श्याम खंदारे सुधीर खंदारे, मोहन खंदारे, गोपाळ खंदारे, प्रकाश खंदारे, शरद खंदारे, देवा खंदारे व अरुण भोसले, सामाजिक कार्यकर्ते युवराज रणदिवे, तानाजी खिलारे, उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सत्यवान खंदारे यांनी केले तर आभार सुधीर खंदारे यांनी मानले.



# शाळेतूनच विद्यार्थ्यांवर संस्कार : बिराजदार

✔ सुराज्य/अक्कलकोट

आपल्या गावच नाव आपल्यालाच मोठ करायचे असते. आयुष्यात येणाऱ्या प्रत्येक संकट, प्रश्न हा पुस्तकातील नसतो, तर ते पुस्तकाच्या बाहेरील येणार आहेत. आपल्या गावची शाळा आहे. येथे फक्त विद्यार्थ्यांना हुशार केला जात नाही. तर यामध्ये संघर्ष आहे. येथे संस्कार घडवले जातात. ग्रामीण भागात सगळ्या बाबतींतून विद्यार्थी तयार होतोय तसा शहरात घडत नाही. विद्यार्थ्यांना ग्रामीण भागातील शाळेतूनच संस्कार मिळतात, असे प्रतिपादन समाजसेवक महेश बिराजदार यांनी केले.


गावातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी महेश बिराजदार यांच्या कडून दर्गनहळ्ळी येथील जिल्हा परिषद शाळा व लकम्मादेवी प्रशालेतील इयत्ता पहिली ते दहावी पर्यंत प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांकाने आलेल्या विद्यार्थ्यांना ट्राफी व रोख रक्कम स्वरूपात बक्षीस देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी महेश बिराजदार म्हणाले, पुढच्या वर्षी जे कोणी विद्यार्थी इयत्ता पहिली पासून ते दहावी पर्यंत पहिला नंबरने पास होतील त्या सर्वांना एक सायकल देण्यात येणार आहे. या कार्यक्रमास शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तरटगाव - शिंगोलीत अभियंता दिन साजरा

✔ सुराज्य/ विरवडे बु : तरटगाव- शिंगोली (ता. मोहोळ) येथील इंजि. सोमनाथ दावणे व इंजि. शंकर दावणे यांच्या महावीर कंट्रक्शन कंपनीच्यावतीने अभियंता दिन साजरा करण्यात आला. यावेळी कंपनीच्या वतीने आदर्श अभियंत्यांचा सत्कार करण्यात आला. अध्यक्षस्थानी मोहोळ तालुका पंचायत समितीचे सदस्य व यांत्रिकी अभियंता अजिंक्यराणा पाटील तर प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्य अभियंता संघटनेचे अध्यक्ष मिलिंद भोसले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला सर विश्वेश्वरय्या यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी टपन डंके, नंदकुमार जगदने, दळवे साहेब, अविनाश वाघमारे, सचिन किरनाळे, महेश पाटील, अगरवाल, अल्ट्राटेकचे मॅनेजर शितलकुमार सिंदखेडे, रोहित रासेराव, यांच्यासह संतोष मते, सागर भोसले, इंद्रजीत ननवरे, केदार पाटील, भारत साळुंखे, नरेंद्र जतकर, आकाश धनिवले, स्वप्निल रणदिवे, हर्षद शेख, करण निकम, आदित्य जगदने, आदेश जगधने, विशाल घाटगे, रितेश मदने, सुरज ढवळे, आशितोष मलशेट्टी, दिग्विजय शिंदे आदी अभियंत्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी गावचे सरपंच अविनाश मोटे, उपसरपंच पांडुरंग रासेराव, सोसायटी चेअरमन कानिक मोटे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आर्यनंदी नागरी पतसंस्थेचे आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर

✔ सुराज्य/सोलापूर : आर्यनंदी नागरी सहकारी पतसंस्था आणि आर्यनंदी एज्युकेशन अँन्ड रिसर्च फाउंडेशन यांच्यातर्फे शिक्षक दिनानिमित्त देण्यात येणारे आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर करण्यात आले आहे. या पुरस्काराचे वितरण मंगळवार, २० सप्टेंबर रोजी सायंकाळी पाच वाजता शिवस्मारक सभागृहात होणार असल्याची माहिती पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. राजेश फडकुले यांनी पत्रकार परिषदेत दिली. पुरस्कारासाठी प्रसाद कुंटे (उपप्राचार्य, संगमेश्वर महाविद्यालय), नीता बिडकर (संगीत विशारद, शि. प्र. मंडळी) मिलिंद खोबरे (सहशिक्षक, जैन गुरुकुल), रेणुका पट्टणशेट्टी (सहशिक्षिका, दमाणी विद्यामंदिर), डॉ. उज्ज्वल मलजी (क्रीडाशिक्षक, सहस्रार्जुन प्रशाला), प्रा. आसमा नदाफ (ग्लोबल व्हिलेज पब्लिक स्कूल, बोरामणी), प्रा. विक्रमसिंह बायस (एस. पी. पॉलिटेक्निक, कुमठे), अनंत बळळे (संस्कृत सहशिक्षक, श्राविका विद्यालय), मीनाक्षी म्हमाणे (सहशिक्षिका, सिध्देश्वर बालक मंदिर), क्षितिजा गाताडे (सहशिक्षिका, दमाणी अंध विद्यालय), फ्लाईड ब्रानकस्ट (संगीत शिक्षक सेंट जोसेफ हायस्कूल) यांची निवड करण्यात आली आहे.



# तुळजाभवानी मातेच्या शारदीय नवरात्रोत्सवास २६ पासून आरंभ

✔ सुराज्य/तुळजापूर

महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजाभवानी मातेच्या शारदीय नवरात्र महोत्सवास सोमवार दि २६ सप्टेंबर रोजी घटस्थापनेने आरंभ होणार आहे.

शारदीय नवरात्रोत्सव पूर्वीच्या मंचकी निद्रेस शनिवार दि१७ सप्टेंबर रोजी आरंभ होणार आहे तर या सोहळ्याचा सांगता मंदिरच्या पोर्णिमा दिनी सोमवार, १० ऑक्टोबर रोजी होणार आहे

प्रतिवर्षाप्रमाणे श्री तुळजा भवानी मंदिर संस्थान, तुळजापूर तर्फे यंदाच्या शारदीय नवराज महोत्सवात सोमवार, २६ सप्टेंबर घटस्थापना, मंगळवार २७ रोजी नित्यापचार पूजा, रात्री छबिना, बुधवार दि २८ रोजी नित्यापचार पूजा, छबिना गुरुवार २९ रोजी रथअलंकार महापूजा, शुक्रवार ३० रोजी ललित पंचमी मुरली अलंकारपूजा, शनिवार १ रोजी शेषशाही अलंकार, रविवार २ रोजी भवानी तलवार, सोमवार ३ रोजी दुर्गाष्टमी महिषासुरमर्दिनी अलंकार पूजा, रात्री ११. ३०वैदिक होमास आरंभ व दुपारी ४. ४५वा. पूर्णाहुती, मंगळवार ४ रोजी महानवमी देवीजींची नित्योपचार पूजा व दुपारी १२ वा, होमावर धार्मिक विधी, घटोथ्यापन व रात्री नगरहुन येणाऱ्या पलंग पालखी मिरवणूक, बुधवार दि ५ रोजी उषाःकाली श्रीदेवीजींचे शिबींकारोहन विजयादशमी (दसरा) सिमोल्लंघन मंदीराभोवती मिरवणूक व मंचकीनिद्रा, रविवार ९ रोजी कोजागिरी पौर्णिमा म्हणजे १० रोजीचे पहाटे श्रीदेविजींची सिहासनावर प्रतिष्ठापना, सोमवार १० रोजी मंदिर पौर्णिमा श्री देविजींची नित्योपचार पुजा, रात्री सोलापूरच्या काठ्यांनसह छबिना व जोगवा होणार आहे.



## कुर्डूवाडीत भाजतर्फे रक्तदान शिबिर

✔ सुराज्य/कुर्डूवाडी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त कुर्डुवाडी शहरात भाजपा युवा मोर्चा माढा तालुक्याच्यावतीने रक्तदान शिबिर घेण्यात आला. यावेळी १७६ रक्तदात्यांनी रक्तदान केले. यावेळी गोविंदराव कुलकर्णी, युवक जिल्हा अध्यक्ष प्रकाश घोडके, युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष उमेश पाटील, तालुका अध्यक्ष योगेश बोबडे, महिला जिल्हा अध्यक्ष धनश्री खटके, जयसिंग ढवळे, सुधिर गाडेकर, अमोल कुलकर्णी, निलेश सुराणा, शंकर बागल, दतात्रेय मोरे, प्रकाश चोपडे, गिरीश तांबे, विजय कोकाटे, प्रतीक्षा गोफ़ने, आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन सुधीरभाऊ गाडेकर यांनी केले व उपस्थितांचे आभार आयोजक उमेश पाटील यांनी मानले.

# एकेकाळचे डाकू बनले चित्ता मित्र

## आफ्रिकेतून आणलेल्या चित्त्यांचं करणार रक्षण; सिकरवार यांच्यावर ७० खून आणि २५० दरोड्याचे गुन्हे

✔ सुराज्य/भोपाळ

मध्य प्रदेशातील चंबळ खोऱ्यात एकेकाळी भीती आणि दहशत पसरवणारे कुख्यात दरोडेखोर रमेश सिंग सिकरवार आता चित्ता मित्र' बनले आहेत. ते आता स्थानिक रहिवाशांमध्ये आफ्रिकेतून आलेल्या ८ चित्त्यांचं महत्त्व पटवून देत असून लोकांमध्ये जनजागृती निर्माण करण्याचं काम करत आहेत. १९७० ते १९८० च्या दशकात चंबळ खोऱ्यावर राज्य करणारे ७२ वर्षीय रमेश सिंग सिकरवार यांच्यावर २५० हून अधिक दरोडे आणि ७० हून अधिक खुनाचे गुन्हे दाखल आहेत. मात्र, १९८४ मध्ये आत्मसमर्पण केल्यापासून ते समाजसेवा करत आहेत.

श्योपूर आणि मुरैना या परिसरातील १७५ गावांमध्ये रमेश सिंग सिकरवार यांना प्रमुख' म्हणून ओळखले जाते. १९८४ मध्ये त्यांनी त्यांच्या टोळीतील ३२ सदस्यांसह आत्मसमर्पण केलं होतं. त्यावेळी राज्य सरकारने त्यांच्या टोळीवर एक लाखाहून अधिक रुपयांचे बक्षीस जाहीर केलं होतं. आठ वर्षे तुरुंगात शिक्षा



भोगल्यानंतर सिकरवार यांनी गुन्हेगारी विश्वाला रामराम ठोकला. आता ते कर्हाळ येथे शेती करून आपलं जीवन जगत आहेत. इतर अनेक दरोडेखोरांप्रमाणे सिकरवार हे त्यांच्या गुन्ह्यातून मुक्त झाले आहेत. मात्र, त्यांचा प्रभाव आणि प्रतिष्ठा अजूनही अबाधित आहे.

आपल्या भूतकाळावर भाष्य करताना रमेश सिंग सिकरवार म्हणाले की, १९७५ मध्ये वयाच्या २२ व्या वर्षी मी अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी आणि आपल्या लोभी काकांपासून आपल्या कुटुंबाचं रक्षण करण्यासाठी बंडखोरी केली. श्योपूर, गुना आणि मुरैना या प्रदेशात नऊ वर्षे राज्य केले, पण मी कधीही अन्यायकारक कृत्य केलं नाही. त्यामुळे लोकांमध्ये माझ्याबद्दल आदर आणि प्रभावाची भावना आहे. लोकांनी चिथावणी देईपर्यंत आम्ही कधीही त्यांच्यावर हल्ला केला नाही. चित्ताही असाच प्राणी आहे, चिथावणी दिल्याशिवाय तो कुणावरही हल्ला करत नाही, अशी प्रतिक्रिया सिकरवार यांनी दिली आहे. ते एका इंग्रजी माध्यमाशी बोलत होते.

### ५० चित्ते भारतात आणण्याची योजना

आफ्रिकेतील नामीबीया देशातून आठ चित्ते आज १७ सप्टेंबर रोजी मध्य प्रदेशातील कुनो नॅशनल पार्क'मध्ये आणले आहेत. या कार्यक्रमाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. पुढील पाच वर्षात आणखी ५० चित्ते भारतात आणण्याची सरकारची योजना आहे. याच पार्श्वभूमीवर सिकरवार हे आपल्या दोन डझन सहकाऱ्यांसमवेत आसपासच्या गावात चित्त्यांविषयी जनजागृती निर्माण करण्याचं काम करत आहेत.

# ३ हजार ५०० कोटींची मदत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा : सत्तार

✔ सुराज्य/मुंबई



मागच्या सरकारमध्ये शेतकऱ्यांच्या मदतीसाठी तिजोरीत खडखडाट होता, हे अजित दादांना देखील माहित असल्याचे वक्तव्य राज्याचे कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांनी केलं. या सरकारमध्ये जर तिजोरीचा खडखडाट असता तर ३ हजार ५०० कोटी रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात गेले नसते असेही सत्तार म्हणाले. खडखडाट दूर करण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस समर्थ असल्याचे सत्तार म्हणाले. दरम्यान, राज्यात यंदा २० लाख शेतकरी अतिवृष्टीमुळं बाधित झाले आहेत. त्यांच्या खात्यावर ३ हजार ५०० कोटी रुपयांची मदत पोहोचली असल्याचेही सत्तार म्हणाले.

दरम्यान, ऑनलाईन ई-पीक पाहणीत बदल करण्याची केंद्र सरकारकडे मागणी करणार असल्याचेही अब्दुल सत्तार यांनी यावेळी सांगितलं. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी समर्थ असल्याचे सत्तार म्हणाले. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यावर मदत पोहोचली आहे. सर्व जिल्ह्याधिकाऱ्यांनी पैसे शेतकऱ्यांच्या खात्यावर ऑनलाईन सोडले आहेत. राज्यात २% लाख शेतकरी अतिवृष्टीमुळं बाधित झाले असल्याचे सत्तार म्हणाले. मराठवाड्यात गोगलगायींमुळं सोयाबीन पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. अशा नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना देखील ९७ कोटी रुपयांची मदत आपण जाहीर केल्याची माहिती सत्तारांनी दिली आहे.



# पटनायक यांच्याकडून पंतप्रधान मोदींना वाढदिवसाच्या खास शुभेच्छा

## तब्बल १२१३ चहाच्या कपांच्या मदतीने साकारले वाळूशिल्प

✔ **सुराज्य/ओडिसा** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा आज ७२ वा वाढदिवस आहे. या निमित्ताने देशभरात ठिकठिकाणी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. प्रसिद्ध वाळू कलाकार सुदर्शन पटनायक यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना अनोख्या पद्धतीने वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. पटनायक यांनी ओडिशातील पुरी बीचवर नरेंद्र मोदींचे पाच फूट वाळूचे शिल्प बनवले आहे. एवढच नाही तर मातीच्या चहाच्या कपांचा वापर करुन त्यांनी मोदींना शुभेच्छा दिल्या आहेत. यासाठी त्यांनी १ हजार २१३ कपांचा वापर केला आहे.

सुदर्शन पटनायक यांनी पंतप्रधान मोदींचा ५ फूट उंच वाळूचा पुतळा बनवण्यात आला आहे. या शिल्पासाठी त्यांनी सुमारे पाच टन वाळू वापरण्यात आली आहे. पटनायक यांनी मोदींच्या प्रत्येक वाढदिवसाला वाळूची वेगवेगळी शिल्पे बनवली आहेत. दरवर्षी पंतप्रधान मोदींच्या वाढदिवसाला पटनायक वेगवेगळ्या प्रकारे वाळूची शिल्पे बनवतात. यावर्षी पंतप्रधानांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना सुदर्शन म्हणाले, आम्ही वाळूच्या शिल्पात मातीच्या चहाचे कप वापरून मोदींचा चहा विक्रेता ते भारताचे पंतप्रधान असा प्रवास दाखवला आहे. आज पुन्हा एकदा आम्ही आमच्या कलेच्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना शुभेच्छा देत आहोत.

# शिवसेनेचा दसरा मेळावा शिवतीर्थावरच होणार : उद्धव ठाकरे

✔ सुराज्य/मंबई

वेदांता फॉक्सकॉन प्रकल्प गुजरातमध्ये जात असताना सध्याचं राज्य सरकार काय करत होतं असा सवाल शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केला आहे. फॉक्सकॉन प्रकल्प राज्याबाहेर गेल्यानंतर उद्धव ठाकरे यांनी पहिल्यांदाच प्रतिक्रिया दिली आहे. शिवसेना भवनमध्ये झालेल्या पदाधिकारी बैठकीत उद्धव ठाकरे यांनी राज्य सरकारवर टीका केली आहे. शिवसेनेचा दसरा मेळावा शिवतिर्थावरच होणार असल्याचंही ते यावेळी म्हणाले.

उद्धव ठाकरे म्हणाले की, गुजरात महाराष्ट्राचा लहान भाऊ आहे. त्यांच्याकडे प्रकल्प गेला, पण राज्य सरकार त्यावेळी काय करत होतं? दोन



महिन्यात फॉक्सकॉन प्रकल्प गुजरातला गेलाच कसा? वेदांता आणि फॉक्सकॉन सारख्या कंपन्या राज्याबाहेर गेल्यामुळे राज्याचं नुकसान झालं आहे. सत्ताधाऱ्यांनी याचं आत्मपरीक्षण करावं.

दसरा मेळावा शिवतीर्थावरच होणार

शिवसेनेचा दसरा मेळावा शिवतीर्थवर होणार की नाही याबाबत संभ्रम असताना उद्धव ठाकरे यांनी आजच्या बैठकीत यावर भाष्य केलं आहे.

### शिवसेना भवनच्या आजच्या बैठकीत ठाकरेंनी काय आदेश दिलेत?

महिला आघाडी, युवा सेना, शिवसैनिकांना सोबत घेण्याचे आदेश, नेस्को येथील पदाधिकारी मेळाव्याकरता शाखापातळीवरही तयारी करा, दसरा मेळाव्याबाबत मनात कोणताही संभ्रम ठेवू नका., दसरा मेळावा शिवतीर्थावरच होणार, मोठ्या प्रमाणात शिवतीर्थवर गर्दी जमवण्याचे आदेश, उद्धव ठाकरे यांची विभाग प्रमुख व उपविभाग प्रमुखांना सूचना, शिवसेनेचा दसरा मेळावा हा दरवर्षी शिवतीर्थावर होतो. पण या वर्षी एकनाथ शिंदे यांनी वेगळा गट स्थापन केल्यानंतर त्यांनीही दसरा मेळावा घेण्याचं नियोजन केलं आहे. शिवतीर्थावर दसरा मेळावा घेण्यास परवानगी देण्यात यावी अशी मागणी आता उद्धव, ठाकरे गट आणि एकनाथ शिंदे गटाकडून करण्यात आली आहे. मुंबई महापालिकेने अद्याप यावर कोणताही निर्णय घेतला नाही.

# मोदी ओबीसी नाहीत, त्याचे पुरावे लवकरच देऊ : पटोले

✔ **सुराज्य/नवी दिल्ली** : पंतप्रधान नरेंद्र मोदी हे ओबीसी नाहीत, भाजप त्यांना ओबीसी म्हणून प्रोजेक्ट करत आहे असा आरोप काँग्रेसच प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. ओबीसींची मतं मिळवण्यासाठी त्याचा हा मोठा प्रयत्न आहे, मात्र मोदी हे ओबीसी नाहीत, त्याचे लवकरच पुरावे देऊन असंही त्यांनी म्हटलंय. ते पुण्यातील पत्रकार परिषदेत बोलत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे गुजरातमधील श्रीमंत जातींपैकी आहेत, आम्ही ते उघड करणार आहोत, असं मोठं वक्तव्य काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.



भाजपवर टीका करताना नाना पटोले म्हणाले की, फॉक्सकॉन प्रकल्प गुजरातला नेणारे सगळे मोदी आणि शाहांचे हस्तक आहेत. त्यांना महाराष्ट्राचं आणि महाराष्ट्रातील तरुण जनतेचं काहीही देणंघेणं नाही. मुख्यमंत्र्यांबाबत काही न बोललेलंच बरं. सध्याचे मुख्यमंत्री नाचगाण्यात व्यस्त आहे. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना असे अनेक प्रकल्प गुजरातला गेले आहेत. त्यांनी काय काय गुजरातला नेलं याची यादी द्यावी. मात्र तेच फडणवीस महाराष्ट्राला गुजरातच्या पुढे नेण्याच्या गोष्टी करतात. राधाकृष्ण विखे पाटील देखील स्वत: केलेला भ्रष्टाचार लपवण्यासाठी भाजपमध्ये गेले.

# एमआयडीसीच्या भूखंडवाटपाला शिंदे सरकारची स्थगिती

**ठाकरे सरकारला दणका**

✔ सुराज्य/मंबई

वेदांता फॉक्सकॉन प्रकल्प महाराष्ट्रातून गुजरातमध्ये गेल्याने सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप रंगले आहेत. हा प्रकल्प राज्यातून का निसटला, यासाठी एकमेकांकडे बोट दाखवले जात आहे. अशातच महाराष्ट्र औद्योगिक महामंडळाच्या (एमआयडीसी) भूखंड वाटपाला स्थगिती देऊन शिंदे-फडणवीस सरकारने महाविकास आघाडीच्या उद्योगां'ना चाप लावला आहे.

फॉक्सकॉन प्रकल्पासाठी आधीच्या ठाकरे सरकारकडून योग्य प्रतिसाद मिळाला नसल्याचा दावा करतानाच



यात सौदेबाजीचाही प्रयत्न झाल्याचाही आरोप शिंदे गट तसेच भाजपाने केला आहे. तर, हा प्रकल्प गुजरातमध्ये जाण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे जबाबदार असल्याचा आरोप शिवसेनेसह काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसने केला आहे. वीज तसेच अन्य सोयीसुविधा आणि अनुदानाची रक्कम मिळविण्यासाठी महाराष्ट्रात उद्योगांना गेली दोन वर्षे १० टक्के लाच द्यावी लागत होती. वेदांत-फॉक्सकॉनचा दीड लाख कोटींचा प्रकल्प होता, मग इथे किती टक्के मागितले होते? १० टक्के नुसारच हिशेब मागितला जात होता की महापालिकेतील रेटने मागणी होत होती? असे सवाल मुंबई भाजपाचे अध्यक्ष ॲड. आशिष शेलार यांनी केले आहेत.

या सर्व पार्श्वभूमीवर आता १ जून २०२२पासून एमआयडीसीने विविध स्तरावर केलेल्या भूखंडवाटपाच्या निर्णयाला स्थगिती देण्यात आली असून फेरविचारासाठी ते उद्योग विभागाकडे पाठविण्याचे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे अपर सचिव भूषण गगराणी यांनी हे आदेश जारी केले आहेत.

# ऑस्ट्रेलियाविरुद्ध टी२० मालिकेत भारतीय खेळाडूंवर असेल सर्वांची नजर

✔ सुराज्य/नवी दिल्ली

भारतीय संघ आगामी आयसीसी टी२० विश्वचषक २०२२ खेळण्यासाठी पूर्णपणे सज्ज झाला आहे. पण त्यापूर्वी भारत ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिकेविरुद्ध टी२० मालिका खेळणार असून ही टीम इंडियाची एकप्रकारे रंगीत तालिम असणार आहे. दरम्यान भारत ऑस्ट्रेलिया या टी२० सामन्यावेळी काही खेळाडूंवर सर्व क्रिकेट जगताच्या खासकरुन भारतीय चाहत्यांचा नजरा असतील.

**विराट कोहली**

भारताचा माजी कर्णधार विराट कोहलीने आशिया चषक २०२२ मध्ये शानदार कामगिरी केली होती. विराटने आशिया कप २०२२ च्या ५ सामन्यात २%६ धावा केल्या. यावेळी अफगाणिस्तानविरुद्धच्या सामन्यात विराटनं ६१ चेंडूत १२२ धावांची शानदार खेळी करत शतकांचा दुष्काळही संपवला. खरंतर



विराट कोहली फॉर्मात आल्यानंतर भारतीय संघ व्यवस्थापन आणि चाहत्यांनी सुटकेचा नि:श्वास सोडला आहे, पण तरी त्याचा हा फॉर्म विश्वचषकातही असाच राहतो का हे पाहण्यासाठी ऑस्ट्रेलियाविरुद्धची ही मालिका अत्यंत महत्त्वाची असणार आहे.

**जसप्रीत बुमराह**

भारताचा मुख्य गोलंदाज जसप्रीत बुमराह दुखापतीमुळे बराच काळ टीम इंडियाचा भाग नव्हता. जसप्रीत बुमराह दुखापतीमुळे आशिया कप २०२२ स्पर्धाची खेळू शकला नाही. परंतु आता बुमराह पूर्णपणे फिट असल्याने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या मालिकेत मैदानात उतरेल. बुमराह संघाचा मुख्य गोलंदाज असल्याने सर्वांच्याच नजरा त्याच्यावर असणार आहेत.

**हर्षल पटेल**

बुमराहसोबतच दुखापतीतून सावरुन पुन्हा संघात एन्ट्री करणाऱ्या हर्षलवरही साऱ्यांच्या नजरा असतील. स्लोवर बॉल किंग असणारा हर्षल डेथ ओव्हर्समध्ये आयपीएलमध्ये चमकल्याने भारतीय संघासाठी विश्वचषकातही तो अशीच कामगिरी करेल अशी आशा आहे. त्यासाठी ही मालिका अत्यंत महत्त्वाची असेल.

**सूर्यकुमार यादव**


सूर्यकुमार यादवने मर्यादित षटकांच्या फॉरमॅटमध्ये मागील काही महिन्यांत प्रभावी खेळ केला आहे. इंग्लंडविरुद्धच्या मालिकेत शतक झळकावल्यानंतर त्याने आशिया कप २०२२ मध्येही चांगली कामगिरी केली. ज्यामुळे सूर्या आता आयसीसी टी२० रँकिंगमध्येही टॉप ५ मध्ये आहे. आता ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या मालिकेत आपले कर्तृत्व दाखवण्यासाठी सूर्या सज्ज झाला असून त्यामुळे त्याच्याकडे सर्वांच्या नजरा असतील.

**मोहम्मद शमी**

मोहम्मद शमीची २०२२ च्या टी-२० विश्वचषकासाठी भारतीय संघात निवड झालेली नाही. तेव्हापासून अनेकजण याबाबत प्रश्न उपस्थित करत आहेत. याआधी मोहम्मद शमीची आशिया कपसाठीही भारतीय संघात निवड झाली नव्हती. मात्र, मोहम्मद शमी ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या मालिकेत टीम इंडियाचा भाग असल्याने यावेळी तो कशी कामगिरी करतो हे पाहण्यासाठी सर्वजण उत्सुक आहेत.

# माजी केंद्रीय मंत्री गावित यांचे निधन

✔ **सुराज्य/मुंबई** : ज्येष्ठ, अनुभवी नेते व माजी केंद्रीय मंत्री माणिकराव गावित यांचे निधन अत्यंत दुःखद असून संसदेत तब्बल ९ वेळा निवडून गेलेले लोकप्रतिनिधी असा त्यांचा लौकिक होता. गावित यांच्या निधनाने राजकीय तसेच सामाजिक क्षेत्रातील प्रदिर्घ अनुभव असलेले लोकाभिमुख नेतृत्व हरपले आहे, अशा शोकभावना महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी व्यक्त केल्या आहेत.



माणिकराव गावित यांचा जन्म नंदूरबार जिल्ह्यातील नवापूर तालुक्यातील धुलिपाडा गावात एका आदिवासी कुटुंबात झाला. गावित यांनी १९८१ पासून २००९ सालापर्यंत सलग नऊवेळा नंदूरबार लोकसभा मतदारसंघातून बहुमताने विजय संपादन केला. १५ व्या लोकसभेत माणिकराव गावित व मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे वासुदेव आचार्य हे तब्बल नऊवेळा खासदारकी भूषवलेले सदस्य होते. गावित यांचा जनसंपर्क दांडगा होता, कार्यकर्त्यांमध्ये दादासाहेब नावाने ते लोकप्रिय होते.

# प्रकल्प गुजरातला पळवला, महाराष्ट्र पाकिस्तान आहे का?

## आदित्य ठाकरेंचा फडणवीसांना सवाल

✔ सुराज्य/मुंबई



शिवसेना नेते आणि युवासेना प्रमुख आमदार आदित्य ठाकरे यांनी वेदांता प्रकल्पावरून शिंदे-फडणवीस सरकारला चांगलेच घेरले आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुजरात पाकिस्तान आहे का या वक्तव्याचा आदित्य ठाकरे यांनी चांगलाच समाचार घेतला. महाराष्ट्र पाकिस्तान आहे की प्रकल्प गुजरातला पळवून लावला. महाराष्ट्राच्या मुलांनी काय चूक केली आहे, असा खरमरीत सवाल आदित्य ठाकरे यांनी राज्य सरकारला केला. आदित्य ठाकरे यांनी थोर समाज सुधारक संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील अग्रणी, झुंजार पत्रकार पणजोबा स्वर्गीय प्रबोधनकार ठाकरे यांच्या स्मृतिस्थळावर जाऊन अभिवादन केले. यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.

आज माझ्या पणजोबांची जयंती आहे आणि मी अभिवादन करायला आलो आहे. माहीममधल्या शिवसैनिकांना भेटलो. माझ्या पणजोबांनी संयुक्त महाराष्ट्रासाठी लढा दिला. आज मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन देखील आहे. आजच मी पेपरमध्ये वाचलं इथून प्रकल्प तिथे गेला याचं कोणाला दुःख नाही आहे याची मला खंत वाटते आहे, असे आदित्य ठाकरे यांनी म्हटले.

आदित्य ठाकरे यांनी यावेळी सरकारने लावलेल्या चौकशीवर भाष्य केले. त्यावेळी महाराष्ट्रासाठी कोणी काही बोलायला लागलं की त्याच्यावर आरोप करायचे, त्याची बदनामी करायची त्याची चौकशी मागायची म्हणजे महाराष्ट्राचा आवाज बुलंद करणं हा आपल्या देशात गुन्हा झालाय का? असा सवाल आदित्य ठाकरे यांनी उपस्थित केला. तसंच पुढे म्हणाले, चौकशी कोणाची करणार? केंद्राची करणार की अग्रवाल यांची करणार? असे प्रश्न उपस्थित करत राज्य सरकारला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला.

घटनाबाह्य सरकार आल्यानंतर दोन चार घटना घडल्या. २६ जुलैला मुख्यमंत्र्यांनी सभागृहात सांगितलं होतं की वेदांता येणार आहे, ४ लाख कोटी घेऊन येणार आहेत. चखऊ च्या मॅगझीनमध्ये सांगितलं की एक लाख कोटी घेऊन येणार आहेत, असेही आदित्य ठाकरे यांनी म्हटले. याशिवाय, अजून एक गोष्ट समोर आली आहे की २९ ऑगस्टला उपमुख्यमंत्री आणि अनिल अगरवाल यांची भेट झाली. ही भेट लहान भावाला प्रकल्प देण्यासाठी झाली का? असा गंभीर सवाल आदित्य ठाकरे यांनी उपस्थित केला.

# यादव यांना अटक होण्याची शक्यता

✔ सुराज्य/पटना

बिहारचे उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. केंद्रीय अन्वेषण विभागाच्या याचिकेवर दिल्लीतील विशेष न्यायालयाने तेजस्वीला नोटीस बजावली आहे. सीबीआयची याचिका मंजूर झाल्यास आयआरसीटीसी घोटाळ्याप्रकरणी तेजस्वी यादव यांना अटक होण्याची शक्यता आहे. मिळालेल्या माहितीनुसार, केंद्रीय अन्वेषण ब्युरो ने खळ्ळ्ळ घोटाळ्यातील त्याचा जामीन रद्द करण्यासाठी दिल्लीतील विशेष न्यायालयात धाव घेतली आहे. या प्रकरणात तेजस्वी यादव २०१८ पासून जामिनावर बाहेर आहेत. याप्रकरणी न्यायालयाने तेजस्वी यादव यांचा जामीन फेटाळला तर बिहारमध्ये त्यांची उपमुख्यमंत्रिपदाची खुर्ची अडचणीत येऊ शकते.



दिल्लीतील सीबीआय न्यायालयाच्या विशेष न्यायाधीश गीतांजली गोयल यांनी तेजस्वी यादव यांना नोटीस बजावल्याचे वृत्त एएनआय या वृत्तसंस्थेने दिले आहे. लालू यादव हे रेल्वेमंत्री असताना त्यांच्या कुटुंबातील अनेक सदस्य या घोटाळ्यात अडकले आहेत. यामध्ये लालूंचा धाकटा मुलगा तेजस्वी यादव यांचाही समावेश आहे. सीबीआयने या प्रकरणात तेजस्वी यादव आणि इतर आरोपींविरुद्ध आयपीसीच्या कलम ४२०, १२०बी आणि भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याच्या इतर कलमांखाली यापूर्वीच आरोपपत्र दाखल केले आहे.


जर सीबीआय न्यायालयासमोर आरोप सिद्ध करण्यात यशस्वी ठरल्यास तेजस्वी यादवला या प्रकरणात ७ वर्षांची शिक्षा होऊ शकते. या प्रकरणात तेजस्वी यादवसोबत त्यांची आई राबडी देवीही आरोपी आहेत. या प्रकरणी २०१८ साली दिल्लीच्या पटियाला हाऊस कोर्टाने आई आणि मुलाला जामीन मंजूर केला होता. राजदचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि तत्कालीन रेल्वेमंत्री लालू प्रसाद यादव हे या प्रकरणातील मुख्य आरोपी आहेत.

# ‘हॉट’ बार्शीत ओपन चलेंजचा नवा ‘जलवा रे जलवा’

**शिवाजी भोसले**

'बार्शी तिथं सरशी' अशी प्रत्येक आघाड्यांवर गत असलेल्या या तालुक्यातला राजकीय जलवा तसा उभ्या महाराष्ट्राला परिचित. भाजपाचे विद्यमान आमदार राजेंद्र राऊत आणि माजी आमदार दिलीप सोपल यांच्यातील राजकारणाचा जलवा, कडवी झुंज ही प्रसिध्द. एकमेकांना पुरुन उरलेल्या राऊत आणि सोपल या दोघांनी आजवर या तालुक्याच्या राजकारणात एकमेकांना कडवं आव्हान दिलेला इतिहास आहे. पण नेहमीच राजकीय गरमी असलेल्या हॉट बार्शीत आता वेगळंचं ओपन चलेंज दिलं गेलंय. विशेषत्वे, हे चलेंज दिलंय, ते आमदार राजेंद्र राऊत यांनी. चलेंज देताना राऊतांनी वापरलेले जे शब्द प्रयोग आहेत, ते अक्षरश: जहरी आहेत. यापूर्वी आव्हान देताना त्यांनी बहुधा हे शब्द प्रयोग वापरले नसावेत. कडव्या संघर्षाचा ठासून साठा भरलेल्या राऊतांच्या भात्यातून जे बाण निघालेत, ते आग ही आग असे काही औरच.

राऊत यांनी दिलेल्या नव्या आव्हानांचा सोपलांनी स्वीकार केल्यास बार्शी तालुक्यातील बिचाऱ्या शेतकऱ्यांचं कल्याण होवू शकतं. आजवर राजकीय पटलावरील राऊतांचं प्रत्येक तगंडं आव्हान स्विकारणारे आनंदयात्री सोपल हे आव्हान आनंदाने स्विकारणार का? राऊतांनी सोडलेले आव्हानांची ङ्गआग ही आगङ्ख बाण परतवून लावतील का? या संदर्भातील औत्सुक्य आता या तालुक्यात सर्वच पक्षातील संबंधितांना, त्याशिवाय राऊत-सोपल समर्थकांना आहे. आव्हान स्विकारण्यावरून बार्शीत म्हणे आता काही जणांच्या पैजाही लागल्याची चर्चा आहे. राऊत परिवार करत असलेला कोणताही व्यवसाय सोपल परिवारानं करून दाखवावा, हेच ते राऊतांनी दिलेले ओपन चलेंज. सोपल परिवारानं आव्हान स्विकारून, समजा या परिवारानं व्यवसाय केले, त्यात जेवढा भाव सोपल देतील, त्यापेक्षा ५० रूपयांनी राऊत यांचा भाव जादा असेल. आव्हान स्विकारून व्यावसाय करताना, शेतकऱ्यांचा फायदा आम्ही बघू, फायदा -तोट्याचा विचार करणार नाही, असंही राऊतांनी म्हटलं आहे.




## आरोपांची नॉनस्टाप एक्सप्रेस

- बार्शीतील उद्योग-व्यवसाय वाढीला दिले नाही प्रोत्साहन
- या शहरातील २२ दाळ मील बंद पडण्याला निष्क्रीय नेतृत्व कारणीभूत
- बाजार समित्यांमधील सेस केवळ २ ते ४ कोटींपर्यंत
- बिचाऱ्या शेतकऱ्यांचे २१ कोटी रूपये बुडविण्याला कारणीभूत

### चढाईत राऊतांची सरशी, सोपलांची गोची

सोपल अन राऊत हे कट्टर राजकीय दुष्मन. राजकीय दुष्मनीतून एकमेकांना पाण्यात पाहणाऱ्या या दोघांनी एकमेकांना खिंडीत तसेच बोळीत गाठण्याची एकही संधी सोडली नाही. यामध्ये कधी सोपल तर कधी राऊतांची सरशी झाली. मात्र कारखाना प्रकरणाशी संबंध असलेल्या २१ कोटी रूपये शेतकऱ्यांना देण्यात प्रकरणात सोपलांवर चढाई करताना राऊत उजवे ठरल्याचं मानण्यात येतंय. कारण २१ कोटी रूपये १५ दिवसांत जिल्हाधिकारी यांच्याकडे भरावे लागणार आहेत. एक रकमी तब्बल २१ कोटी भरणं म्हणजे दिवसा चांदण्या दिसण्यासारखं भव्य आहे. यातून सोपल हे खिंडीत सापडले गेलेत असं मानण्यात येतय.

### उद्योगाची अगली मंझिल

बार्शी शहरातील उद्योग - व्यवसायासंदर्भात सोपल यांच्यावर चौफेर जहरी टिकेचे बाण सोडताना आमदार राजेंद्र राऊत यांनी राऊत परिवाराच्या सगळ्याच उद्योग धंद्यांची कुंडली सांगतानाच जामगाव या ठिकाणी आपले सुपुत्र प्रकल्प उभारणार आहेत, याशिवाय दाळ मिल प्रकल्पदेखील सुरु होत आहे, हे सांगितले. त्याशिवाय आपले दोन मित्र प्रकल्प साकारात आहेत. त्यांना आपण सहकार्य करीत आहोत हेदेखील ते म्हणाले.

### राऊतांचा डब्बल उखळी बॉम्ब

घाम गाळणाऱ्या शेतकऱ्यांचे २१ कोटी रूपये बुडविण्याच्या मुद्यांवरून राऊत हे सोपल यांची जंत्री काढत आहे. या परिवाराने कोणाच्या जागा आणि जमिनी कशा बळावल्या हे नावासह सांगत आहेत, शेतकऱ्यांचे २१ कोटी द्यावेत, सोपल परिवाराने एक रूपयादेखील कोणाचा बुडवू नये, आपण कोणाचा एक छदाम कधी बुडवला नाही. बँकेचे खाते कधी थकबाकीत जावू दिले नाही. विट भट्टीसाठी पाच लाख कर्ज काढण्यापासून कर्ज घेण्याला सुरुवात केली. सगळी कर्जे व्यवस्थित भरली जात आहेत. सोपलांनी आपल्यासारखे उद्योग काढावेत, त्यांना पत्रकारांमार्फत आपलं ओपन चलेंज आहे. राऊतसोबत आव्हान स्विकारून यावं पटांगणात राऊतांशी खेळ खेळायला, असा इशाराही त्यांनी आव्हान देताना दिला आहे. इतकेच काय सोपल परिवारातील नशाबाजी संदर्भातदेखील राऊतांनी पंचनामा केला.

# जोमात आलेली राष्ट्रवादी सत्तांतरानंतर गेली कोमात

**अजित उंब्रजकर**

घर फिरले की घराचे वासेही फिरतात ही म्हण अगदी तंतोतंत सोलापूर शहर राष्ट्रवादीला लागू होत आहे.सत्ता असताना जोमात असलेली राष्ट्रवादीला काँग्रेस सत्ता नसताना आता कोमात गेल्याचे चित्र दिसत आहे. सत्ता असताना अनेक नेते राष्ट्रवादीला प्रवेश यासाठी इच्छुक होते. सद्य परिस्थितीत राष्ट्रवादीत जाण्यासाठी इच्छुक असलेले महेश कोठे, आनंद चंदनशिवे यांच्यासारखे अनेक नेत्यांनी सध्या वेट ॲन्ड वॉचची भूमिका घेतल्याचे दिसून येत आहे.

महाराष्ट्रात महाआघाडीच्या माध्यमातून राष्ट्रवादीला सत्तेत आल्यानंतर दोन- अडीच वर्षासाठी पक्षाला संपूर्ण राज्यात चांगले दिवस आले. सोलापूर शहरातही तशीच परिस्थिती दिसून आली. महापालिका निवडणुकीत डझनभरच्या आसपास नगरसेवक निवडून येणाऱ्या राष्ट्रवादीला सुगीचे दिवस आले. त्यामुळे दस्तुरखुद्द, पक्षाचे सर्वेसर्वा खा. शरद पवार यांनी सोलापुरात लक्ष घातले. पवार यांनी सोलापूर महापालिकेत राष्ट्रवादीचा महापौर बसवण्याचे स्वप्न पाहिले होते. सोलापुरात मेळावा घेऊन याबाबत घोषणाही केली. त्यानंतर राष्ट्रवादीमध्ये अनेक दिग्गजांचा ओढा वाढल्याने पवारांचे स्वप्न खरे होते की काय अशी परिस्थिती निर्माण झाली होती. माजी महापौर महेश कोठे, आनंद चंदनशिवे, तौफिक शेख, सुधीर खरटमल यांच्यासह अनेक नेते राष्ट्रवादीमध्ये प्रवेश करण्यासाठी इच्छुक होते. तत्कालिन पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांनी विविध निधी देऊन अनेक नेत्यांना, पदाधिकाऱ्यांना पक्षात आणण्यासाठी प्रयत्न सुरू केले होते. खा. शरद पवार, अजित पवार, जयंत पाटील, खा. सुप्रिया सुळे, माजी पालकमंत्री दत्तात्रय भरणे आदींनी सोलापूर शहरात दौरे ही करून राष्ट्रवादी मजबूत करण्याचा प्रयत्न केला. इतर पक्षातील नगरसेवकांना निधीचे आमिष दाखवत स्वतःकडे ओढण्याचा प्रयत्नही केला. राष्ट्रवादीने महेश कोठे यांच्या माध्यमातून शिवसेना आणि काँग्रेसमधील नेते फोडण्यावर भर दिला. याला काही प्रमाणात यशही आले. सेनेचे दहा ते पंधरा, काँग्रेसचे ५ आणि एमआयएमचे ६ असे मिळून २५ ते ३० नगरसेवक नगरसेवक राष्ट्रवादीच्या संपर्कात आले. त्यांचा प्रवेशाचा कार्यक्रमही ठरला. सर्व काही सुरळीत असताना जून महिन्यामध्ये महाराष्ट्रात सत्तांतर झाले त्यानंतर भाजप आणि सेनेची (शिंदे गट) सत्ता आली तर काँग्रेस राष्ट्रवादी आणि उद्धव ठाकरे यांची शिवसेना सत्तेच्या बाहेर पडली. अचानक महाराष्ट्रात झालेल्या सत्ता बदलानंतर मात्र घड्याळाचे काटे उलटे फिरल्याचे दिसून येत आहे सत्तांतर झाल्यानंतर राष्ट्रवादीमध्ये प्रवेश करणाऱ्यांचा ओढा थांबला आहे. तौफिक शेख हे मात्र याला अपवाद ठरले. त्यांनी आपल्या समर्थकांसह आपला प्रवेश पक्का करत शरद पवारांचा विश्वास शाबूत ठेवला. मात्र इतर नेत्यांचे प्रवेश मात्र रखडले. सत्तातंरानंतर जे राष्ट्रवादीच्या संपर्कात होते अशा काही प्रमुख माजी नगरसेवक, पदाधिकाऱ्यांनी शिंदे गटाचा रस्ता धरला आहे. तर अनेकांनी वेट ॲन्ड वॉचची भूमिका घेतली आहे. याशिवाय खुद्द राष्ट्रवादीमधीलही शेकडो पदाधिकाऱ्यांनी पक्षाचा राजीनामा देत शिंदे गटाचा रस्ता धरला आहे. या पदाधिकाऱ्यांनी पक्षातीलच नेत्यांवर आरोप सुरू केले आहेत. त्यामुळे मध्यंतरी वर्षभराच्या काळात जोमात आलेली राष्ट्रवादी काँग्रेस कोमात गेल्याचे दिसत आहे. त्यामुळे शरद पवारांनी महापौर बसवण्याचे पाहिलेले स्वप्न स्वप्न राहण्याची शक्यता सध्या तरी राजकीय परिस्थितीवरून दिसत आहे.

### वेट ॲन्ड वॉच

माजी महापौर महेश कोठे, आनंद चंदनशिवे हे प्रमुख दोन नेते राष्ट्रवादीमध्ये जाण्यास इच्छुक होते. कोठे यांनी तर इतर पक्षातील नेते, पदाधिकाऱ्यांना फोडून राष्ट्रवादीत आणले. आनंद चंदनशिवे यांनीही माजी पालकमंत्री दत्ता भरणे यांच्या माध्यमातून मोठा निधी आणला होता. या दोघांच्या प्रवेशाची सर्वांनाच उत्सुकता होती. मात्र सत्तांतर झाल्यानंतर या दोघांनीही सध्या वेट ॲन्ड वॉचची भूमिका घेतल्याचे दिसून येत आहे. आगामी काळात कोठे आणि चंदनशिवे कोणता झेंडा हाती घेणार याची चर्चा मात्र महापालिकेतील कट्ट्यावर रोज होत आहे.







# छापेमारीमुळे मिळाला बुस्टर डोस

**सुरज सरवदे**

राजकारणात कोणती गोष्ट कधी फायद्याची ठरेल सांगता येत नसते. गेल्या आठवड्यात विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अभिजित पाटील आणि त्यांच्या खाजगी साखर कारखान्यावर आयकर विभागाने धाडी टाकल्या होत्या. आयकर विभागाकडे अभिजित पाटील यांच्या विरुद्ध १२८ तक्रारी केल्यानंतरही आयकर विभागाला रिकाम्या हाती माघारी जावे लागते होते.

अभिजित पाटील यांच्याकडे अल्पावधीतच ५ खाजगी आणि एक सहकारी साखर कारखाना आहे. भाजप सत्तेत असताना २०१७ साली अभिजित पाटील यांनी उस्मानाबाद येथे पहिली साखर कारखाना विकत घेतला. त्यानंतर २०१८ नाशिक येथील साखर कारखाना भाडेतत्त्वावर घेतला. त्यानंतर २०१९ साली नांदेड येथील साखर कारखाना विकत घेतला. तिन्ही साखर कारखाने व्यवस्थित चालवले. अभिजित पाटलांनी शेतकऱ्यांना वेळेवर बिल, कामगारांच्या पगारी, ऊस तोडणी वाहतुकदारांची देणी वेळेवर दिल्यामुळे शेतकऱ्यांचा त्यांनी विश्वास संपादन केला. दरम्यान महाविकास आघाडी सरकारने २०२१ साली १२ वर्षे बंद असलेला सांगोला सहकारी साखर कारखाना अभिजित पाटील यांना भाडेतत्त्वावर दिला. शेतकऱ्यांची बिले, कामगारांच्या पगारी देऊन कारखाना व्यवस्थित चालवला. विठ्ठल सहकारी साखर कारखाना बंद असल्यामुळे सांगोला सहकारी साखर कारखान्याने बहुतांश विठ्ठलच्या सभासदांचा ऊस गाळप केला आणि त्याचवेळी विठ्ठलच्या राजकारणात उडी घेतली. सत्ताधाऱ्यांच्या नाकर्तेपणामुळे उद्‌ध्वस्त झालेल्या विठ्ठल साखर कारखाना सभासदांनी अभिजित पाटील यांच्या ताब्यात दिला. विशेष म्हणजे विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे २००७ साली ऊस टोळी मालक असलेले अभिजित पाटील विठ्ठलचे अध्यक्ष झाले. याच दरम्यान बीड येथे सहावा साखर कारखाना भाडेतत्त्वावर घेतला.

आयकरच्या धाडींचा परिणाम अभिजित पाटील यांच्याबद्दल प्रचंड सहानभूती वाढली आहे. विठ्ठल परिवारातील नेते, कार्यकर्त्यांनी अभिजित पाटील यांना भेटून आपला पाठिंबा दर्शविला आहे. आयकरच्या कारवाई दरम्यान अनेकांनी देव पाण्यात ठेवून अभिजित पाटील यांच्यावरील कारवाई थांबवण्याची प्रार्थना केली होती. आयकरच्या करवाईमध्ये काहीही निष्पन्न न झाल्यामुळे अभिजित पाटील हे सहकारातील, राजकारणातील निष्कलंकित नेतृत्व असल्याचे सिद्ध झाल्याची भावना कार्यकर्त्यांमध्ये निर्माण झाली आहे.

### विस्कटलेला विठ्ठल एकसंघ झाला

अभिजित पाटील यांच्यावर आयकरची छापेमारी राजकिय हस्तक्षेपामुळे झाल्याची अंदाज अभिजित पाटील यांनी व्यक्त केला. आयकरच्या छापेमारी काही सापडले असते तर विरोधकांनी त्याचे श्रेय घेतले असते तर वावगं ठरलं असतं. मात्र छापेमरी अमच्यामुळे सुरू झाली असे सोशल मीडियावर टाकणे विरोधकांना अंगलट आले. याचाच फायदा अभिजित पाटील यांनी घेतला. छापेमारी नंतर अभिजित पाटील यांनी पुन्हा परिचारक यांना थेट अंगावर घेतले. आपल्या नेतृत्वाची धमक दाखवली. त्यामुळे विस्कटलेला विठ्ठल एकसंघ झाला. स्व आमदार भारत भालके यांच्यानंतर विठ्ठल परिवाराला अभिजित पाटील यांच्या रुपात तरुण ताडपदार, धाडसी नेतृत्व मिळाले आहे.




# राजकारण छे... नको रे बाबा, शेवटच्या श्वासापर्यंत समाजकारणच

**रविकांत धनशेट्टी**

शून्यातून विश्वाची निर्मिती करत स्वकर्तृत्वावर, निस्वार्थी व प्रामाणिकपणे समाजाची सेवा करत भक्ती, श्रद्धा आणि श्रमाला प्राधान्य देत अनेकांना रोजगार उपलब्ध करून देत... मानवता हाच धर्म मानणारे एम. के. फाऊंडेशनच्या माध्यमातून आजपर्यंत हजारो लोकांचे कल्याण करणारे एम. के. फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष महादेव कोगनुरे यांचे कार्य दीपस्तंभप्रमाणे असून महादेव कोगनुरे इतरांसाठी प्रेरणादायी ठरले आहेत. त्यांच्याकडे मदत मागायला गेलेली व्यक्ती कधीही रिकाम्या हाताने परतत नाही. कोणत्याही स्वरुपाचे स्वार्थ न ठेवता सर्वांच्याच सुखदुःखात सामील होण्यात ते नेहमी आघाडीवर असतात. आता त्यांनी समाजकारणातून वाटचाल करीत राजकारणात यावे, अशी सर्वसामान्य जनतेची तीव्र इच्छा व जोरदार मागणीही होत असल्याने त्यावर मत अजमावण्यासाठी प्रस्तुत प्रतिनिधीने कोगनुरे यांना समक्ष भेटून सविस्तरपणे चर्चा केली.त्यावेळी बोलताना ते म्हणाले की- ‘‘समाजकारणाचा मला पहिल्यापासूनच छंद, आवड व जिद्द असून एक सामाजिक बांधिलकी म्हणून जनतेच्या सेवेसाठी जेवढे जमेल, तेवढे मी शेवटच्या श्वासापर्यंत काम करणार आहे, याच्यातच मला खूप मोठा आनंद, समाधान मिळणार असल्याने राजकारणात यायचं, जायचं प्रश्नच येत नाही’’.

अक्कलकोट तालुक्यातील केगाव (खुर्द) या पाचशे-सहाशे घरांची वस्ती असलेल्या गावात जन्मलेले शांत, संयमी, निस्वार्थी व स्वच्छ प्रतिमेचे असलेले कोगनुरे यांची कौटुंबिक परिस्थिती हलाखीची होती. घरात दहावी उत्तीर्ण झालेले महादेव हेच एकमेव.मोठा भाऊ भीमाशंकर हे सोलापुरात एका दुकानात कामाला असल्याने वडिलांकडे हट्ट धरून महादेव केवळ दहा रुपये घेऊन सोलापुरात १९९२ च्या सुमारास दाखल झाले. शिवाजी नाईट कॉलेजला अकरावीला प्रवेश घेतल्यावर त्यांनी नोकरी शोधायला सुरुवात केली. योगायोगाने एका सिमेंट कंपनीत नोकरीचा श्रीगणेशा झाला. महादेव कोगनुरे यांनी ऑफिसबॉय म्हणून नोकरीचा श्रीगणेशा करीत काही वर्षांत सागर सिमेंटचे मुख्य व्यवस्थापक पदापर्यंत मजल मारली.

याच काळात म्हणजेच १९९७ च्या सुमारास वडील बसण्णा यांचे निधन झाले. याकाळात अवघ्या अठरा वर्षे वय असलेल्या महादेव यांचा कामाचा व्याप आणि त्याची आवड वाढल्याने शिक्षणाला ब्रेक लागला तो कायमचाच. पण शिक्षण अर्धवट राहिल्याचा त्यांच्या प्रगतीवर कोणताही परिणाम झाला नाही. जवळपास पंधरा-सोळा वर्षे कंपनीत केलेल्या सेवेमुळे सागर सिमेंट या कंपनीत त्यांना सिनिअर सेल्स ऑफिसर म्हणून २००८ मध्ये संधी मिळाली. कंपनी नव्यानेच आल्याने महादेव यांना इतर नामचीन सिमेंट उत्पादनाच्या तुलनेत सागर सिमेंटची उत्पादने बाजारात लोकप्रिय करण्यासाठी खूप मेहनत घ्यावी लागली. कंपनीचे उत्पादन लोकाभिमुख केल्याने कंपनी व्यवस्थापनाने त्यांना बढती देत व्यवस्थापक या पदावर विराजमान केले. २००८ मध्ये सोलापुरातून सुरू झालेल्या सागर सिमेंटच्या उत्पादनाला महादेव कोगनुरे यांनी आपल्या कौशल्याने 'ब्रॅण्ड' बनविले. शिक्षणाचे महत्व ओळखुन शैक्षणिक मदत करताना सोलापूर जिल्ह्यातील जि . प . प्राथ . शाळेत शिकणाऱ्या गरजू विद्यार्थ्यांना आतापर्यंत जिल्ह्यात १.५० लाख पेक्षा जास्त वह्यांचे वाटप, पुस्तकांची मदत केली. गरजू विद्यार्थ्यांना सायकल वाटप केले. एम . के . फाउंडेशनच्या वतीने पहिल्या व दुसऱ्या लॉकडाऊन काळात गोरगरिब हजारों कुटुंबियांना अन्नधान्य किटचे वाटप केले. लॉकडाऊनच्या काळात काडादी मंगल कार्यालय सोलापूर येथील कोविड सेंटरला बायप्याप आणि ऑक्सिजन मशिन भेट दिली. एम. के फाउंडेशनच्या माध्यमातून सामाजिक कार्य करताना दक्षिण सोलापूर आणि अक्कलकोट तालुक्यात त्यांनी आपली ताकद निर्माण केली आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत आतापर्यंत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने आरोग्य मंत्री डॉ. राजेश टोपे आणि विरोधी पक्ष नेते देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते कोवीड काळातील कार्याबद्दल विशेष सामाजिक सन्मान पुरस्कार, कर्नाटक सरकारच्या वतीने सामाजिक कार्याबद्दल'राष्ट्रीय बसव रत्न पुरस्कार', ड्रीम फाउंडेशन च्या वतीने डॉ . कलाम राष्ट्र उभारणी पुरस्कार, अजिंक्य बहुद्देशीय संस्था खडकी यांच्यावतीने राज्यस्तरीय समाज रत्न पुरस्कार, श्रीमंतयोगी प्रतिष्ठान च्या वतीने अन्नदाता पुरस्कार, रोटरी क्लब च्या वतीने कोरोना योध्दा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. कोगनुरे यांनी आज पर्यंत गोरगरिबांच्या हितासाठी केलेल्या समाज कार्यातच समाधान असल्याने कुठल्याही प्रकारचे राजकारणात समाविष्ट होणार नसल्याचे त्यांनी सांगितल्याने यावरून आता सध्या तरी त्यांच्या डोक्यात राजकारणाचा विषय नसल्याचे स्पष्टपणे दिसून आल्याने राजकारणाच्या विषयाला पूर्णविराम मिळाला.







# भाजपने थोपटले दंड तरीही राष्ट्रवादी थंड

**डी.एस.गायकवाड**

भाजपाचे नूतन जिल्हाध्यक्ष आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या सत्कार कार्यक्रमात भाजपाने सोलापूर जिल्हा काबीज करण्यासाठी दंड थोपटलेले दिसत असले तरी राष्ट्रवादी मात्र थंड अवस्थेत पाहायला मिळत आहे.

सद्यस्थितीला सोलापूर जिल्ह्यावर भाजपाचे वर्चस्व पाहायला मिळत असून एकेकाळी निर्विवाद सत्ता असणारी राष्ट्रवादी मात्र जिल्ह्याच्या राजकारणात थंड अवस्थेत पाहायला मिळत आहे. श्रीकांत देशमुख यांच्या तथाकथित प्रकरणावरून भाजपाला खाली पाहायची वेळ आली होती मात्र त्यातून सावरून दमदार युवक नेता असणाऱ्या आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या गळ्यात जिल्हाध्यक्ष पदाची माळ टाकत भाजपाने पुन्हा एकदा येणाऱ्या सर्वच निवडणुकांसाठी ‘हम सब तैयार है’चा इशारा दिला आहे. सोलापूर येथे झालेल्या जिल्हाध्यक्ष निवडीच्या सत्कार प्रसंगी जिल्ह्यातील सर्वच मान्यवरांनी उपस्थिती लावली. भाजपासाठी मनोबल उंचावणारा हा कार्यक्रम ठरला. मात्र दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अबोल स्थितीत दिसत आहे.

महाराष्ट्रातील सरकार बदलाने सोलापूर जिल्ह्यातील राष्ट्रवादी खचलेली दिसत आहे. कोणताच नेता राष्ट्रवादीसाठी पुढे येऊन जिल्ह्याची मोट बांधताना दिसत नाही.अंतर्गत हेवेदाव्यात रुतल्या सारखी अवस्था राष्ट्रवादीची झाली आहे. मध्यंतरीच्या काळात काही बडे नेते भाजपावासी होणार असल्याच्या चर्चेने तर राष्ट्रवादी पुरती घायाळ झाली होती. तरीही राष्ट्रवादीला जिल्ह्यात१ उभारी मिळताना दिसत नाही. त्यामुळे राष्ट्रवादी कोल्ड तर भाजपा हॉट स्थितीत दिसत आहे. सोलापूर जिल्ह्याचे




प्रभारी पद घेतल्यापासून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आतापासूनच पेरणी करायला सुरुवात केलेली दिसत आहे. त्यांनी आखलेल्या रणनीतीपुढे सोलापूर जिल्ह्यातील राष्ट्रवादी टिकेल का हेही बघणे औत्सुक्याचे राहणार आहे. भाजपाच्या मिशन लोटसचे राष्ट्रवादी पुढे तगडे आव्हान असणार आहे.येणारा निवडणुकांचा काळ पाहता राष्ट्रवादीला कसरत करावी लागणार आहे. प्रत्येक तालुक्यात भाजपा सक्षम होताना दिसत असताना राष्ट्रवादी मात्र गटातटामुळे गटांगळ्या खात असताना दिसत आहे.

सोलापूर जिल्ह्याच्या राजकीय रणांगणात भाजप आणि राष्ट्रवादीमध्ये सत्ता संघर्ष पाहायला मिळतो. पण फडणवीस यांनी जिल्ह्याची सूत्रे हातात घेतल्यापासून राष्ट्रवादीच्या नेत्यांचा नूर बदललेला दिसत आहे. अटीतटीच्या पक्षीय राजकीय वातावरणात आपल्या नेतृत्वाचा बळी जाऊ नये याची काळजी राष्ट्रवादीतील काही नेते मंडळी घेताना दिसत आहेत त्यामुळे राष्ट्रवादी पक्षाला उभारी देणारा नेता वरिष्ठांना शोधावा लागणार आहे. फडणवीस यांचा राज्यातील त्याचबरोबर केंद्रातील राजकीय दबदबा पाहता भाजपावर टीका करून त्यांना अंगावर घेण्याची हिंमत जिल्ह्यातील कोणताच नेता करणार नाही, अशी परिस्थिती आहे. माविआ चे सरकार असताना जिल्ह्यातील नेतृत्वाला राष्ट्रवादीने मंत्रीपदाची संधी दिली नाही हेही दुखणे राष्ट्रवादीच्या नेतेमंडळीच्या मनात आहे. त्यामुळे पुढे येऊन कार्य करायला अनेक जण धाजवताना दिसत नाहीत.

### राष्ट्रवादीला आता कोण तारणार?

मागील काही वर्षात माढ्याचे शिंदे बंधू राष्ट्रवादीसाठी तारणहार बनले होते पण काही दिवसांपूर्वी आमदार बबनदादा शिंदे यांची भाजपा प्रवेशाची चर्चा रंगली होती. यावर विरोधी पक्षनेते अजितदादा पवार यांनी पडदा टाकला होता. या सर्व प्रकरणामुळे आमदार बबनदादा शिंदे यांचे पक्षातील वजन घटताना दिसत आहे. आमदार संजय शिंदे हे देखील पूर्वीसारखे राष्ट्रवादी पक्षासाठी अग्रेसिव भूमिका घेताना दिसत नाहीत. त्यामुळे शिंदे बंधूंचे मौन हा देखील जिल्ह्यात चर्चेचा विषय बनला आहे. त्यामुळे राष्ट्रवादीला आता कोण तारणार हा प्रश्न राष्ट्रवादी प्रेमींना सतावताना दिसत आहे.

### मोहिते- पाटलांमुळे भाजपला आधार

मोहिते पाटील यांनी जिल्ह्याच्या राजकारणावर आपला दबदबा कायम ठेवला असून ‘चलो भाजपा की ओर’ म्हणत अनेकांना सामावून घेत आ. रणजितसिंह मोहिते पाटील, भाजपाचे संघटन सरचिटणीस धैर्यशील मोहिते पाटील, माजी सरपंच शिवतेजसिंह मोहिते पाटील हे भाजपा वाढविण्यासाठी जीवाचे रान करताना दिसत आहेत. मोहिते पाटील यांच्यामुळे जिल्हा भाजपाला एक भक्कम आधार प्राप्त झाला आहे आणि या आधारावर जिल्ह्यात भाजपाचे एक हाती वर्चस्व निर्माण होताना दिसत आहे.